# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
# अधिसभेच्या १५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
# शनिवार, दि.१८ मार्च, २०१७ दुपारी १२:०० वा.

अधिसभेची १५ वी बैठक दि.१८ मार्च, २०१७ रोजी दुपारी १२:०० वा. व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. मालदार एन. एन. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. देशपांडे एस. एम., विभागीय सहसंचालक, सोलापूर विभाग, सोलापूर मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) पुणे यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ३) | श्री. मते एच. बी., संचालक विद्यार्थी कल्याण मंडळ | सदस्य |
| ४) | प्रा. डॉ. घुटे व्ही. बी. प्र. संचालक ज्ञान स्त्रोत केंद्र | सदस्य |
| ५) | प्रा. पी. प्रभाकर | सदस्य |
| ६) | प्रा. डॉ. पाटील व्ही. बी. | सदस्य |
| ७) | डॉ. घनवट ए. ए. | सदस्य |
| ८) | डॉ. वलेकर डी. एम. | सदस्य |
| ९) | श्री. छत्रबंद एस. एम. | सदस्य |
| १०) | श्री. पाटील बी. पी. संचालक परीक्षा व मूल्यमापन तथा प्र. कुलसचिव | सदस्य सचिव |

## स्वागत:

मा. प्र. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष आणि अधिसभेचे सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

प्रा. पी. प्रभाकर, प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील, डॉ. ए. ए. घनवट, डॉ. डी. एम. वलेकर व श्री. एस. एम. छत्रबंद यांचे मा.कुलगुरुंनी सोलापूर विद्यापीठाच्या अधिसभेवर नामनिर्देशन केल्यानंतर या सर्वांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे मा. कुलगुरुंच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

## अनुपस्थिती :

डॉ. डी. आर. नंदनवार प्र. सहसंचालक, (तंत्र शिक्षण), मा. शिक्षण संचालक (तंत्र शिक्षण) यांचे प्रतिनिधी, मा. आमदार श्री. गणपतराव देशमुख, विधानसभा सदस्य, मा. आमदार ॲड श्री. दिलीप

सोपल, विधानसभा सदस्य व मा. आमदार श्री.प्रशांत परिचारक, विधानपरिषद सदस्य अधिसभेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

प्रभारी कुलसचिवांनी मा.कुलगुरुंना चौदाव्या अधिसभेच्या बैठकीपासून या बैठकीदरम्यानच्या कालावधीतील विद्यापीठातील घडामोडीचा आणि प्रगतीचा अहवाल सादर करण्याबाबत विनंती केली व त्याप्रमाणे मा. कुलगुरुंनी खालीलप्रमाणे अहवाल सादर केला.

➢ **कुलसचिव कार्यालय:**

१) सर्व विद्याशाखेतील पदवीच्या द्वितीय वर्षाचे सर्व अभ्यासक्रम निवड आधारित श्रेयांक प्रणाली (CBCS) नुसार करण्यासाठी उपसमितीच्या बैठका संपन्न झाल्या.

२) सोलापूर विद्यापीठ, सोलापूर व डॉ. अनंत ॲन्ड लाभसेटवार चॅरिटेबल ट्रस्ट, नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित व्याख्यानमालेचे ८ वे पुष्प प्राचार्य डॉ. सुनीलकुमार लवटे, जेष्ठ साहित्यिक व समाजसेवक, कोल्हापूर यांनी गुंफले. यावेळी “धर्मनिरपेक्ष भारत-आजची गरज” या विषयावर दि.१८ जानेवारी, २०१७ रोजी व्याख्यान झाले.

३) प्रस्तुत विद्यापीठात शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मध्ये प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नव्याने खालील १४ सुवर्णपदके देणगीदारांच्या देणगीतून सुरु करण्यासाठी विविध प्राधिकरणांची मान्यता घेण्यात आलेली होती.

    १) Prof. K. B. Powar Memorial Gold Medal
    २) प्रा. श्री. ना. गोडबोले स्मृती श्रीलीला सुवर्णपदक
    ३) सौ. शांताबाई निवृत्ती गायकवाड (स्वकुळसाळी) सुवर्णपदक
    ४) Anil Vasantrao Pandhe Gold Medal
    ५) श्रीमती सुलभा शंकर पांडे सुवर्णपदक
    ६) कु. प्रिया लक्ष्मण कदम सुवर्णपदक
    ७) स्व. कु. अंजली वसंतराव बनसुडे सुवर्णपदक
    ८) प्राचार्य डॉ. वसंतराव गणपत बनसुडे सुवर्णपदक
    ९) श्री. सुशीलकुमारजी शिंदे सुवर्णपदक
    १०) कै. प्रभाकर दिगंबर शिरवळकर सुवर्णपदक
    ११) Late Shriman Bhausaheb Gandhi Gold Medal-१
    १२) Late Shriman Bhausaheb Gandhi Gold Medal-२
    १३) Late Shriman Bhausaheb Gandhi Gold Medal-३
    १४) श्री. विश्वास विनायक काकडे सुवर्णपदक

त्यानुसार दि.२९/०१/२०१७ रोजी पार पडलेल्या १२ व्या दीक्षांत समारंभामध्ये एकूण ४१ सुवर्णपदके विविध विषयातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थी / विद्यार्थिनीस देण्यात आली.

४) शै. वर्ष २०१६-१७ साठी पात्रता अर्जातील त्रुटी विभागात जमा करण्यासाठी ३१ डिसेंबर, २०१६ ही तारीख देण्यात आली होती. परंतू १२ पुरवणी परीक्षेमुळे प्रवेश प्रक्रिया उशिरा झाल्यामुळे सदरची तारीख वाढवून १५ जानेवारी, २०१७ इतकी करुन पात्रता अर्जासंदर्भातील त्रुटीं महाविद्यालयांकडून पूर्ण करुन घेण्यात आल्या.

५) अहवाल कालावधीमध्ये शै. वर्ष २०१६-१७ करिता बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी, एन्ट्रेप्रेन्युअरशिप) बी. बी. ए., बी. सी. ए., बी. एस्सी. (ई.सी.एस.), एम. ए. (सर्व विषय) एम. कॉम., एम. एस्सी. (सर्व विषय) या अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जाची तपासणी करण्यात आली असून तपासणी अंती आवश्यक कागदपत्रे अपूर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या त्रुटी ऑनलाईन पध्दतीने कळविण्यात आल्या आहेत व पात्र विद्यार्थ्यांची अंतिम पात्रता करण्यात आली आहे.

६) अहवाल कालावधीमध्ये शै. वर्ष २०१४-२०१५-१६ करिता प्रवेशित कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, शिक्षणशास्त्र, शारीरिक शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, एम. ए. (सर्व विषय) एम. कॉम., एम. एस्सी. (सर्व विषय) एम. सी. ए., पी. जी. डी. सी. ए., डी. बी. एम., एम. एस. डब्ल्यू., एम. बी. ए. या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जातील त्रुटी संबंधित महाविद्यालयांना व विद्यापीठातील संकुलांना ऑनलाईन कळविण्यात आल्या होत्या. परंतु विहीत मुदतीनंतर त्रुटींची पूर्तता केलेल्या व पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांची पात्रता कायम करण्यात येत आहे.

७) अभियांत्रिकी, शिक्षणशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, विधी, एम.बी.ए. या अभ्यासक्रमांचा प्रवेश केंद्रिय प्रवेश प्रक्रियेमार्फत होतो. सदर अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या उशिरा प्राप्त झाल्यामुळे अभियांत्रिकी, शिक्षणशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र, विधी व एम. बी. ए. या अभ्यासक्रमासाठी तारीख वाढवून दि.१५ फेब्रुवारी, २०१७ करण्यात आली व तसे संबंधित महाविद्यालयांना कळविण्यात आले.

८) अहवाल कालावधीमध्ये शै. वर्ष २०१६-१७ करिता एम. सी. ए., एम. एस. डब्ल्यु., पी.जी.डी.सी.ए., पी. जी. डी. एम., बी. ए. एलएलबी., एलएल. बी., एलएल. एम., एम. बी. ए., बी. एड., एम. एड., बी. पी. एड, प्रथम वर्ष फार्मसी, थेट द्वितीय वर्ष फार्मसी, एम. फार्मसी, या अभ्यासक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जांची तपासणी करण्यात आली असून तपासणी अंती आवश्यक कागदपत्रे अपूर्ण असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या त्रुटी ऑनलाईन पद्धतीने महाविद्यालयास कळविण्यात आल्या आहेत.

९) शै. वर्ष २०१३-१४, २०१५-१६ ते २०१६-१७ मध्ये एम. फिल. व पीएच. डी. या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या अर्जाची तपासणी करुन ज्या विद्यार्थ्यानी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केली नाही, अशा विद्यार्थ्यांच्या नावांची यादी तसेच पात्र विद्यार्थ्यांच्या नावांच्या याद्या देखील संबंधित महाविद्यालयांना आणि महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ (बी.सी.यु.डी.) यांच्याकडे पाठविण्यात आल्या आहेत.

१०) अहवाल कालावधीमध्ये शै. वर्ष २०१६-१७ मध्ये विद्यापीठ अधिविभागात प्रवेश घेतलेल्या विविध संकुलातील "मुली शिकवा समाज घडवा" या योजनेसाठी विद्यार्थिनींच्या अर्जाच्या अनुषंगाने विद्यापीठस्तरीय गठीत समितीने १३ विद्यार्थिनींची निवड केली. सदर विद्यार्थिनींचे शैक्षणिक, परीक्षा

शुल्क, वसतिगृह व भोजन शुल्क तसेच अभ्यास सहल इ. शुल्क देण्याकरिता वित्त व लेखा विभागाकडे संबंधित प्रकरण पाठविण्यात आले.

११) बार कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांच्या पत्रातील सुचनेनुसार, विधी विद्याशाखेच्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश वयोमर्यादेच्या सवलतीबाबत Legal Education Rules २००८ मधील नियम क्र.२८ नुसार प्रवेशाकरिता वयोमर्यादा निश्चित करण्यासाठी मा. समन्वयक विधी विषयतज्ञांची व विद्यापीठ कायदा अधिकारी यांची संयुक्त बैठक घेवून सदर बैठकीतील ठरावनुसार संबंधित महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे.

१२) विद्यापीठ अनुदान आयोगाने मा. उच्च न्यायालय व विद्यापीठ अनुदान आयोग आणि मानव संसाधन विकास मंत्रालय यांनी दिलेल्या सुचनेनुसार विद्यार्थ्यांना रॅगींग प्रतिबंध बाबत www.antiragging.in या संकेतस्थळावर माहिती सादर करण्याबाबत सर्व संलग्नित महाविद्यालयांना व संकुलांना कळविण्यात आले आहे.

१३) शै. वर्ष २०१५-१६ मध्ये प्रवेश घेतलेल्या विशेष मागासवर्गीय प्रवर्गातील (SBC) एकूण ३२ विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती पोटी ₹५,०७,३२०/- इतकी रक्कम प्राप्त झाली असून सदरची रक्कम ज्या त्या विद्यार्थ्यांच्या नावे शिक्षण शुल्क व इतर शुल्क पोटी शिष्यवृत्ती खात्यामधून विद्यापीठ खात्यामध्ये वर्ग करण्यास वित्त व लेखा विभागाकडे पाठविण्यात आली आहे.

१४) अहवाल कालावधीमध्ये शै. वर्ष २०१६-१७ मध्ये विद्यापीठ अधिविभागात प्रवेश घेतलेल्या एकूण ४३७ मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळण्याकरिता ऑनलाईन अर्ज भरले आहेत. समाज कल्याण विभागाकडून शुल्क निश्चित करण्यात आले असून सदर शिष्यवृत्ती अर्जावर ऑनलाईन पध्दतीने पुढील कार्यवाही सुरु आहे. तसेच विभागामार्फत प्राप्त झालेल्या शिष्यवृत्ती अर्जाची तपासणी करुन सदरचे अर्ज ऑनलाईन मा. सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, सोलापूर यांच्याकडे पाठविण्याची प्रक्रिया पूर्ण केली आहे.

१५) अहवाल कालावधीमध्ये शै. वर्ष २०१६-१७ मध्ये विविध संकुलामध्ये प्रवेश घेतलेल्या एकूण ५२ मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचे अर्ज भरलेले नसल्याने संबंधित संकुलातील विद्यार्थ्यांना प्रवेश व इतर शुल्क भरण्याबाबतचे परिपत्रक पाठविण्यात आले आहे. त्याचप्रमाणे खुल्या प्रवर्गातील एकूण १२३ विद्यार्थ्यांनी देखील उर्वरित शै. शुल्क भरले नसल्याने संबंधित संकुलातील विद्यार्थ्यांना प्रवेश इतर शुल्क भरण्याबाबत परिपत्रकाद्वारे कळविण्यात आले आहे.

१६) सोलापूर विद्यापीठाने समाजाचे उत्तरदायित्व लक्षात घेवून शाहीर अमर शेख यांच्या कार्याची ओळख नवीन पिढीस व्हावी या हेतूने दि.२५/१०/२०१६ रोजी विद्यापीठ सभागृहात एकदिवसीय परिसंवादाचे आयोजन केले होते. सदर कार्यक्रमास उदघाटक म्हणून मा. प्रा. प्रकाश खांडगे, समन्वयक, शाहीर अमर शेख लोककला अकादमी, मुंबई विद्यापीठ, मुंबई हे होते. तर डॉ. अब्दुल अजीज नदाफ, प्रा. तानाजी ठोंबरे, श्री. नंदकुमार फाटे, श्री. अक्रम पठाण यांची विशेष उपस्थिती होती.

१७) प्रस्तुत विद्यापीठातील ९ शिक्षकांचे सेवापुस्तक तपासून सहाव्या वेतन आयोगानुसार करण्यात आलेली वेतननिश्चिती मा. वरिष्ठ लेखाधिकारी, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांनी पडताळणी करुन मान्यता दिली आहे.

१८) प्रस्तुत विद्यापीठात वर्ग १ व ४ या संवर्गातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सेवापुस्तक अद्ययावत करुन त्यावर संबंधितांच्या स्वाक्षऱ्या घेण्यात आल्या आहेत.

१९) दि.०५/११/२०१६ रोजी विद्यापीठातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या प्रशासकीय कामकाजात अचूकपणा व गती येण्यासाठी सोलापूरातील प्रसिध्द विधीज्ञ मा. ॲड बी. एस. सलगर यांचे "प्रशासकीय कामकाजात उद्भवणाऱ्या कायदेशीर अडचणी व त्यावर उपाय" या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

२०) विद्यापीठात नव्याने रुजू झालेल्या वर्ग ३ व ४ मधील एकूण ३० कर्मचारी यांची पदस्थापना करण्यात आली आहे.

२१) मा. पोलीस आयुक्त व मा. पोलीस उपआयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, सोलापूर यांच्या पत्रानुसार विद्यापीठाने सुरक्षित वाहतूक ही काळाची गरज याचे भान ठेवून दि.०३/१२/२०१६ रोजी सुरक्षित वाहतूक नियमासंदर्भात प्रबोधनपर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. सदर व्याख्यानात श्री. आगलावे, पोलीस निरीक्षक, श्री. चौगुले, सहायक पोलीस निरीक्षक वाहतूक नियंत्रण शाखा, सोलापूर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. आर. वाय. पाटील, संचालक, बी. सी. यु. डी. होते तर व्यासपीठावर मा. श्री. बी. पी. पाटील, परीक्षा नियंत्रक तथा प्र. कुलसचिव आणि मा. डॉ. बी. सी. शेवाळे, वित्त व लेखाधिकारी होते. डॉ. पी. एन. कोळेकर यांनी सूत्रसंचालन केले तर श्री. ए. बी. जाधव, सहायक कुलसचिव, आस्थापना विभाग यांनी आभार मानले. या कार्यक्रमास विद्यापीठातील विद्यार्थी / विद्यार्थिनी, शिक्षक, अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

२२) दि.२९/११/२०१६ ते दि.३०/११/२०१६ यादरम्यान प्रा. डॉ. एल. पी. देशमुख यांनी International Symposium on Electronics and Smart Devices (ISESD-२०१६) यात इंडोनेशिया, बांडूग येथे साधन व्यक्ती म्हणून मार्गदर्शन केले.

२३) मा. संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, पुणे या कार्यालयाच्या सूचनेनुसार विद्यापीठाची सध्याची प्रवेशित, परीक्षार्थींची विद्यार्थी संख्या व प्रशासनातील अपुरे मनुष्यबळ यांचा मेळ घालून पदनिर्मितीचा प्रस्ताव तयार करुन मा. संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांना पाठविण्यात आला आहे.

२४) दि.१३/१२/२०१६ रोजी विद्यापीठातील विद्यार्थी / विद्यार्थिनी, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी थोर पत्रकार श्री. निळू दामले यांचे "महाराष्ट्रातील पत्रकारिता" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

२५) डॉ. सौ. माया पाटील यांना दि.१६/११/२०१६ रोजीच्या पत्रान्वये ICHR, नवी दिल्ली या संस्थेकडून Chronological Study & Documentation of Ter, Dist. Osmanabad, Maharashtra (Satvahana to Yadava Period) या प्रकल्पासाठी ₹४ लक्ष अनुदान मंजूर झाले.

२६) भूशास्त्र संकुलातील दोन कंत्राटी शिक्षकांनी त्यांच्या वैयक्तिक कारणास्तव दिलेला राजीनामा मंजूर केल्याने रिक्त झालेल्या पदासाठी Walk in Interview दि.११/०१/२०१७ रोजी रितसर मुलाखत घेवून निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती पत्रे देण्यात आली.

२७) डॉ. डी. एन. मिश्रा यांनी प्रकृती अस्वास्थामुळे दिलेला राजीनामा प्रशासनाने मंजूर करुन त्यांना दि.१५/१२/२०१६ रोजी कार्यमुक्त करण्यात आले. सदर रिक्त पदाची जाहिरात दि.२३/०१/२०१७

रोजी दैनिक सकाळ, लोकसत्ता, महाराष्ट्र शासन व विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तसेच ए. आय. यु., नवी दिल्ली येथे प्रसिध्द करण्यात आली.

२८) शै. वर्ष २०१५-१६ करितांचे नियमित शिक्षकांचे स्वयंमूल्यमापन अहवाल मा. कुलगुरुमहोदयांनी पुनर्विलोकन करुन आस्थापना विभागास पाठविले आहे. त्या अनुषंगाने प्रस्तुत कार्यालयाने सर्व संकुलातील शिक्षकांना पत्र पाठवून स्वयंमुल्यमापन अहवालातील वरिष्ठांचे शेरे व सूचना दाखवून अहवालावर स्वाक्षरी घेण्यात आल्या.

२९) सामाजिकशास्त्रे संकुलातील डॉ. चंद्रकांत सातप्पा भानुमते यांचे अपघाती निधन झाल्याने त्यांच्या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात एका कंत्राटी शिक्षकांची नेमणूक करण्यात आली.

- **महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ:**

१) शैक्षणिक वर्ष २०१६-१७ करिता जनविकास केंद्रांतर्गत सुरू असलेल्या सहा महिने कालावधीच्या व १ वर्ष कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क, विद्यार्थ्यांची यादी व प्रति विद्यार्थी विद्यापीठाचा २५% हिस्सा इतके शुल्क सर्व महाविद्यालय व मान्यता प्राप्त संस्थाकडून प्राप्त झाली आहे.

२) जनविकास केंद्रातर्गत सुरु असणाऱ्या ६ महिने कालावधीच्या सर्व अभ्यासक्रमाच्या परीक्षा दि.१७/०१/२०१७ पासून दि.२१ जानेवारी २०१७ या कालावधीमध्ये एकूण ६ केंद्रावर घेण्यात आल्या. या परीक्षेसाठी एकूण २९७ विद्यार्थ्यांनी उपस्थिती नोंदविली. या परीक्षेच्या निकालाचे काम सुरू आहे.

३) जनविकास केंद्रातंर्गत शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठी नविन महाविद्यालय / संस्थाना संलग्निकरण व संलग्निकरणाचे नूतनीकरण करण्यासाठी दै. पुढारी व दै. तरुणभारत या वृत्तपत्रामध्ये दि.१७/०१/२०१७ रोजी जाहीर निवेदन प्रसिध्द करण्यात आले.

४) विद्यापीठांतर्गत शैक्षणिक वर्ष २०१६-१७ साठी विद्यापीठांतर्गत महाविद्यालयस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सव वालचंद इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, सोलापूर येथे दि.२७ व २८ डिसेंबर २०१६ दरम्यान संपन्न झाला एकूण ६ विभागात एकूण **२६७** सहभागी झाले होते. त्यातून ४१ स्पर्धक निवडले त्यांना राज्यस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सव-२०१६ साठी पुढील प्रशिक्षण देण्यासाठी दि.७/०१/२०१७ ते दि.०८/०१/२०१७ रोजी विद्यापीठ परिसरात कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्यास एकूण ४० विद्यार्थी उपस्थित होते.

५) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे दि.२७ जानेवारी २०१७ ते दि.२९ जानेवारी २०१७ रोजी राज्यस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सव-२०१६ साठी २ संघव्यवस्थापक व ४० स्पर्धक हे दि.२६ जानेवारी २०१७ रोजी उपस्थित होते.

६) स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथे आयोजित आंतरविद्यापीठ राज्यस्तरीय अविष्कार संशोधन महोत्सवात सहभागी स्पर्धकामध्ये प्रस्तुत विद्यापीठातील २ स्पर्धकांनी प्रथम क्रमांक मिळवला आहे. १) कृषी व पशुसंवर्धन या विद्याशाखेतून शिक्षकस्तरावरील प्रथम पारितोषिक डी. बी. एफ. दयानंद आर्टस् ॲण्ड सायन्स महाविद्यालयाचे प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा.डॉ.लक्ष्मीकांत बसवराज दामा यांना मिळाले. २) वाणिज्य, व्यवस्थापन व विधी या विद्याशाखेतील

प्रथम पारितोषिक स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, पंढरपूर येथील श्रीमती रेणुका मारूती वाडेकर यांना पारितोषिक मिळाले. विजेता स्पर्धकांचा मा.कुलगुरुमहोदयांनी सत्कार करून अभिनंदन केले. विजेत्या स्पर्धकांना NIMS University, Jaipur येथे दि.०७ ते ०८ मार्च २०१७ रोजी आयोजित पश्चिम क्षेत्रीय Anveshan: Student Research Convetions साठी सहभागी होण्यासाठी खालील प्रमाणे संघ पाठविण्यात आला.

| Sr. No. | Name of Participants | Category |
|---|---|---|
| 1. | Sonawane Swapnagandha R. | Agriculture |
| 2. | Priti Bharaatising Rajput | Basic Science |
| 3. | Kshirsagar Vidyarani S. | Engineering & Technology |
| 4. | Anmol Basavraj Valasange | Health Science & Allied Subject, Pharmacy etc. |
| 5. | Yogiraj Langote | Social Science, Humanities, Commerce & Management |

७) प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्य, सहाय्यक प्राध्यापक, ग्रंथपाल व शा.शि.संचालकांची रिक्त पदे भरण्यासाठी प्राप्त झालेल्या अठरा (१८) प्रस्तावांची तपासणी करुन जाहिरातीच्या मसुद्यास मान्यता देण्यात आली. या सर्व जाहिराती विद्यापीठाच्या su.digitaluniversity.ac या संकेत स्थळावर "Employment opportunities" या शिर्षकाखाली प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

८) प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित दोन (०२) अनुदानित महाविद्यालयातील शिक्षक व एका (०१) शिक्षकेत्तर पदाची तसेच एका (०१) कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील शिक्षक पदांची बिंदुनामावली नोंदवही प्राथमिक तपासणी करुन देण्यात आली.

९) विशेष कक्ष विभागात सहाय्यक प्राध्यापक पदासाठी दि.१६ ऑक्टोबर, २०१६ ते दि.३१ जानेवारी, २०१७ अखेर नऊ (०९) मागासवर्गीय उमेदवारांनी नाव नोंदणी केलेली असून, उमेदवारांची नावे विद्यापीठाच्या su.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर “Special cell” या शिर्षकाखाली प्रसिध्द करण्यात आली आहेत.

१०) पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व सेट / नेट परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या मागासवर्गीय व इतर प्रवर्गातील उमेदवारांसाठी दि.०७ जानेवारी, २०१७ रोजी सेट / नेट परीक्षा पेपर क्र.१ प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली. सदर कार्यशाळेस १) मा. प्रा. डॉ. ब्रिजमोहन दायमा व २) मा. प्रा. डॉ. सारीका ब्रिजमोहन दायमा, दयानंद कॉलेज ऑफ कॉमर्स, लातूर यांचे मार्गदर्शन लाभले. ३६० विद्यार्थ्यांनी सदर कार्यशाळेचा लाभ घेतला.

११) पीएच. डी अभ्यासक्रमास प्रवेशित एक्केचाळीस (४१) विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा व एम. फिल अभ्यासक्रमास प्रवेशित दोन (०२) विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा घेण्यात आली.

१२) विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या, स्थानिक निवड समिती अहवालावर योग्य ती कार्यवाही करुन संबंधित निवडीस मान्यता असल्याचे कळविण्यात आले. (एकूण ९०० अध्यापकांना)

१३) विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयाकडून प्राप्त विद्यपीठ विहित निवड समितीमार्फत प्राप्त शिफारशीनुसार ४७ शिक्षकास परिविक्षाधीन कालावधीसाठी मान्यता देण्यात आली.

१४) विद्यापीठ निवड समितीमार्फत प्राप्त अहवालाच्या अनुषंगाने ४ प्राचार्यांना मान्यता देण्यात आल्या.

१५) या विभागास प्राप्त माहिती अधिकार २००५ अंतर्गत प्राप्त अर्जावर कार्यवाही करून संबंधितांना माहितीबाबत कळविण्यात आले आहे. (७ अर्ज)

१६) Google form द्वारे महाविद्यालयामार्फत सर्व नियमित शिक्षकांची माहिती घेवून शिक्षकांची विषयानुसार यादी अद्ययावत करण्यात आली आहे.

१७) संलग्नित सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी संख्येनुसार शिक्षक पदमान्यता देण्यात आली आहे.

१८) संलग्नित महाविद्यालयाचे शैक्षणिक व प्रशासकीय मूल्यमापनाच्या दुसऱ्या टप्प्याच्या कार्यवाहीस सुरुवात केलेली आहे.

१९) प्रस्तुत विद्यापीठास प्राप्त झालेल्या नवीन महाविद्यालय, विषय व अतिरिक्त तुकडी शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून सुरु करण्यासाठी तज्ञ समितीचा अहवाल प्राप्त झालेला असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

२०) शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा सुधारीत शैक्षणिक बृहत आराखडा तयार करुन शासनास पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.

२१) शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या एका वर्षाचा शैक्षणिक बृहत आराखडा तयार करुन शासनास पाठविण्याची कार्यवाही सुरु आहे.

२२) प्रस्तुत विद्यापीठाचे संलग्नित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमाचे काही महाविद्यालयास डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे, जि. रायगड कडे शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून संलग्नित होण्यास्तव प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले.

२३) श्रीमती काशीबाई नवले कॉलेज ऑफ एज्युकेशन, कमलापूर ता. सांगोला या महाविद्यालयाच्या निरंतर संलग्निकरणास शैक्षणिक वर्ष २०१७-१८ पासून मान्यता देण्यात आलेली आहे.

२४) कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर येथील १ सहाय्यक प्राध्यापक तसेच सोलापूर सोशल असोसिएशन्स आर्टस् ॲण्ड कॉमर्स, सोलापूर येथील ३ सहाय्यक प्राध्यापकांना सहाय्यक प्राध्यापक संवर्गातून सहयोगी प्राध्यापक संवर्गात पदोन्नतीची मान्यता देण्यात आली.

२५) वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर येथील २ सहाय्यक प्राध्यापक, छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड कॉमर्स, सोलापूर येथील १ सहाय्यक प्राध्यापक, डी. पी. बी. दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन येथील १ सहाय्यक प्राध्यापक, एकूण ४ सहाय्यक प्राध्यापक यांना सहाय्यक प्राध्यापक संवर्गातून सहयोगी प्राध्यापक संवर्गात पदोन्नतीबाबत विषयतज्ञ समिती गठीत करण्यात आली.

२६) डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, सोलापूर येथील डॉ. व्ही. सी. दंडे यांचा Major Research Project चा प्रस्ताव ICSSR, नवी दिल्ली यांच्याकडे मंजूरीकरिता पाठविण्यात आला.

२७) आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, माढा या महाविद्यालयाचा Career Oriented Courses for Arts Faculty under XII Plan चा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्याकडे मंजूरीकरिता पाठविण्यात आला.

२८) महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त झालेल्या विविध पत्रावर योग्य ती कार्यवाही करुन, संबंधित कार्यालयास योग्य ती माहिती देण्यात आली.

२९) विद्यापीठ अनुदान आयोग, पुणे व दिल्ली यांच्याकडून प्राप्त पत्रे व परिपत्रके सर्व संलग्नित महाविद्यालयांना पाठविण्यात आली.

३०) चेंजिस इन स्टाफचे प्रस्ताव पडताळणीसाठी बैठक संपन्न झाली.

३१) दि.१९/०९/१९९१ ते दि.१३/१०/१९९२ या कालावधीत नियुक्त बिगर नेट / सेट अध्यापकांच्या स्थाननिश्चितीचे प्रस्ताव पडताळणीसाठी बैठक संपन्न झाली.

३२) श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा येथील ३ सहाय्यक प्राध्यापक, डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, सोलापूर येथील ९ सहाय्यक प्राध्यापक, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर येथील १ सहाय्यक प्राध्यापक, संतोष भीमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप येथील ८ सहाय्यक प्राध्यापक, सौ. सुवर्णलता गांधी महाविद्यालय, वैराग येथील १ सहाय्यक प्राध्यापक एकूण २२ सहाय्यक प्राध्यापकांना स्टेज २ व ३ मध्ये स्थाननिश्चितीची मान्यता देण्यात आली.

३३) डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयातील ५ सहाय्य्क प्राध्यापक, डी. पी. बी. दयानंद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर या महाविद्यालयातील १ सहाय्यक प्राध्यापिका, विठ्ठलराव शिंदे आर्टस् कॉलेज, टेंभूर्णी येथील ६ सहाय्यक प्राध्यापक, राजर्षि शाहू लॉ कॉलेज, बार्शी येथील १ सहाय्यक प्राध्यापक, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर येथील ५ सहाय्यक प्राध्यापक, श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी येथील २ सहाय्यक प्राध्यापक, एकूण २० सहाय्यक प्राध्यापकांना स्टेज २ व ३ मध्ये स्थाननिश्चितीकरिता विषयतज्ञ समिती गठीत करण्यात आली.

३४) कॉलेज ऑफ एज्युकेशन, बार्शी येथील डॉ. एस. डी. भिलेगांवकर, डी. ए. व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर येथील डॉ. व्ही. एस. कटके यांच्या API मुल्यांकनाची मान्यता व प्रमाणपत्र महाविद्यालयांना पाठविण्यात आले.

३५) यशवंतभाऊ पाटील महाविद्यालय, भोसे येथील डॉ. मुजमुले संजय उत्तरेश्वर यांच्या API प्रस्ताव पडताळणीसाठीची बैठक संपन्न झाली.

३६) दि.१५/११/२०१६ रोजी विद्यापीठाचा पहिला AQAR रिपोर्ट नॅक, बेंगलोर यांना ईमेलद्वारे पाठविण्यात आला आहे.

३७) रुसा अंतर्गत १० Smart Class Room Products विद्यापीठास प्राप्त झाले असून त्यांचे प्रत्येक संकुलास २ याप्रमाणे वितरण करुन Installation केलेले आहे.

३८) रुसा अंतर्गत विद्यापीठास प्राप्त झालेले १७० संगणकांचे मागणिप्रमाणे विभागास / संकुलास वितरण करण्यात आलेले आहेत.

३९) प्रस्तुत विद्यापीठात RUSA यांनी निर्देशित केल्याप्रमाणे, मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या नामनिर्देशानुसार IPR Cell गठित करण्यात आली.

४०) RUSA अंतर्गत दि.०३/०१/२०१७ रोजी Bhuvan RUSA Work Progress Entry Form बाबतची बैठक मा. संचालक, म.वि.वि.मं. यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली.

४१) RUSA अंतर्गत दि.०६/०१/२०१७ रोजी मुंबई येथे RUSA Prioritized Works for the Second Phase बाबत झालेल्या बैठकीमध्ये प्रस्तुत विद्यापीठाचे Second Phase -7 Cr. चे प्रस्ताव सादर करण्यात आले.

➢ **वित्त व लेखा विभाग:**

१) विद्यापीठाचे सन २०१६-१७ मधील माहे एप्रिल २०१६ ते सप्टेंबर २०१६ पर्यंतचे संवैधानिक लेखापरिक्षण सनदी लेखापाल टॅप ॲण्ड असोसिएट, सोलापूर यांनी पूर्ण केले आहे.

२) विद्यापीठाचे सन २०१५-१६ चा वित्तीय वर्षाचे लेखा परीक्षा केलेले वार्षिक लेखा अहवाल माहे डिसेंबर २०१६ मध्ये विधानमंडळाच्या सभागृहामध्ये सादर करण्यात आला.

३) विद्यापीठाचे सन २०१६-१७ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१७-१८ चे मुळ अंदाजपत्रक वेळेत तयार करुन वित्त व लेखा समितीच्या मान्यतेच्या शिफारशीनुसार व्यवस्थापन परिषदेने अधिसभेस मान्यतेसाठी शिफारस केलेली असून सदरचा विषय दि.१८/०३/२०१७ रोजी होणाऱ्या अधिसभेच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आला आहे.

४) मा. महालेखाकार, मुंबई या कार्यालयाकडून प्राप्त झालेला अद्यावत १० परिच्छेदाचा अनुपालन अहवाल मा. महालेखाकार कार्यालय, मुंबई यांच्याकडे सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.

५) मा. राज्यपाल व विद्यापीठ अनुदान आयोगाकडून प्राप्त सुचनेनुसार जास्तीत जास्त रोख विरहीत कॅश काऊंटरवर रक्कम स्विकारण्याकरिता ॲक्सिस बँकेकडून दोन स्वाईप मशीन उपलब्ध करुन देण्यात आले असून त्यानुसार Debit Card & Credit Card द्वारे विविध प्रकारचे फी स्विकारली जात आहे.

➢ **परीक्षा विभाग:**

१) बी. ए., बी. कॉम., बी. एस्सी., बी. बी. ए., बी. सी. ए. व एल. एल. बी. / बी. ए. एल. एल. बी. या अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्षाच्या अनिवार्य पर्यावरणशास्त्र या विषयाची परीक्षा रविवार दि.१३ नोव्हेंबर, २०१६ रोजी विविध ५३ परीक्षा केंद्रांवर पार पडली. या परीक्षेकरिता प्रथमच पर्यावरणशास्त्र या विषयाची प्रश्नपत्रिका ऑनलाईन पध्दतीने पाठविण्यात आल्या.

२) दि.१६ ऑक्टोबर, २०१६ पासून सुरु झालेल्या एम. एस्सी. व एम. सी. ए. सायन्स या अभ्यासक्रमांच्या प्रश्नपत्रिका या वेळी ऑनलाईन पध्दतीने पाठविण्यात आल्या.

३) ऑक्टो / नोव्हें., २०१६ मध्ये होणाऱ्या व्यावसायिक परीक्षांच्या मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रांच्या प्राचार्य, समन्वयक व कर्मचाऱ्यांची बैठक दि.१४/१०/२०१६ रोजी संपन्न झाली.

४) व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या अभियांत्रिकी विद्याशाखांचे सर्व प्रश्नपत्रिका ऑनलाईन प्रणालीद्वारे वितरित करुन परीक्षा यशस्वीरित्या पार पाडल्या.

५) ऑक्टो / नोव्हें., २०१६ मध्ये घेण्यात आलेल्या कला, विज्ञान, वाणिज्य, विधी, व्यवस्थापन, शिक्षणशास्त्र या सर्व अभ्यासक्रमाचे सत्रनिहाय परीक्षांचे निकाल जाहीर करण्यात आले.

६) परीक्षा मंडळाची बैठक दि.१९/११/२०१६ रोजी संपन्न झाली.

७) विद्यार्थ्यांना ऑनलाईन अद्ययावत माहिती सत्वर उपलब्ध होण्यासाठी K-iosk हे उपकरण सर्व विद्यार्थी व अभ्यागतांना वापरण्यासाठी मुख्य प्रशासकीय इमारतीत उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

८) दि.०९/०१/२०१७ रोजीच्या अभियांत्रिकी व दि.१६/०१/२०१७ ते दि.२०/०१/२०१७ दरम्यान होणाऱ्या शिक्षणशास्त्र व विधी अभ्यासक्रमाच्या सत्र १ च्या परीक्षा नियोजन करण्यात आल्या प्रमाणे पार पाडल्या.

९) मा. राजेश अग्रवाल समितीच्या शिफारशीनुसार, परीक्षेच्या कामकाजात तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे, व एकूण ३३ शिफारशींची अंमलबजावणी पूर्ण करण्यात आलेली आहे.

१०) परीक्षा प्रमादाकरिता प्राप्त होणारे अर्ज हे ऑनलाईन प्रणालीद्वारे स्वीकारण्यात येत आहे.

११) विद्यापीठाचा १२ व्या दीक्षांत समारंभात विविध विषयात गुणवत्ता प्राप्त केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना ४१ सुवर्णपदकाने गौरविण्यात आले. तसेच १०५ विद्यार्थ्यांना विद्या वाचस्पती (पीएच.डी.) पदवी प्रदान करण्यात आला. याप्रसंगी एकूण २४६१६ इतके स्नातक पदवी प्राप्त करण्यास पात्र झाले. त्यातील एकंदर ८२९१ इतक्या स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आली. त्यापैकी २९५० विद्यार्थी स्वत: उपस्थित राहून पदवी ग्रहण केली.

१२) गत वर्षीच्या पदवी प्रमाणपत्रात करण्यात आलेला बदलाप्रमाणे विद्यार्थ्यांना प्रदान केले जाणारे प्रमाणपत्र हे डी मॅटिंग केले असून सदर प्रमाणपत्रावर QR Code, Gold Foil, Embossing इ. सुरक्षा विषयक उपायसहित छपाई करण्यात आली आहे. सदर प्रमाणपत्र हे Tear Resistant, Waterproof असून प्रमाणपत्र A ४ Size Teslin Paper वर छपाई करण्यात आलेले आहे. असे प्रमाणपत्र देणारे सोलापूर विद्यापीठ हे राज्यातील पहिले विद्यापीठ ठरले आहे. अनुपस्थित पदवीधर विद्यार्थ्यांना त्यांच्या Login मध्ये सदर प्रमाणपत्राची रंगीत प्रिंट उपलब्ध होत आहे. सन २०१७ या वर्षाचे Degree Certificate हे आधार कार्डशी संलग्न करण्यात आलेले आहे.

१३) ऑनलाईन पेमेंटचा उपयोग करुन गाऊन करिताचे शुल्क व अनामत रक्कम कॅशलेस पध्दतीने स्वीकारले आहे.

➢ **ग्रंथालय:**

१) RUSA अंतर्गत प्राप्त झालेल्या अनुदानातून ₹४७,४७,९९३/- इतक्या रकमेची e-Books, ₹६,५४,८२४/- इतकी रकमेची Print Book व ₹२१,६८,९४८/- रकमेची Print Foreign Journals खरेदी करण्यात आली. RUSA अंतर्गत खरेदी केलेल्या e-Books ची download प्रक्रिया पूर्ण झालेली आहे.

२) RUSA अंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या पुस्तकांचे वर्गीकरण, तालिकीकरण व बारकोडिंग इत्यादी कामे पूर्ण करुन त्या पुस्तकांची रॅक्सवर मांडणी केली.

३) UGC अंतर्गत मिळालेल्या अनुदानातून विविध संकुलाकडून पुस्तक खरेदीसाठी प्राप्त झालेल्या याद्यांप्रमाणे पुस्तकांची खरेदी करण्यात आली.

४) दि.०६/१२/२०१६ रोजी ग्रंथालयात निवडक व उत्तम पुस्तकांचा प्रदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

५) सन २०१७ या वर्षासाठी भारतीय नियतकालिकांची खरेदीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

➢ **संकुले:**

१) डॉ. व्ही. बालाराम (Emeritus Scientist) यांनी पाहुणे व्याख्याता म्हणून दि.१८/१०/२०१६ रोजी "Environmental Pollution and control Measures" आणि "Chemistry, Environmental and Society" या विषयावर व्याख्यान देवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच दि. १९/१०/२०१६ रोजी "Advancement in Instrumentation in Earth and Environmental" आणि "Platinum group Element Exploration Studies in India: Challenges and Opportunities" या विषयावर व्याख्यान देवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

२) प्रा. डॉ. पी. प्रभाकर दि.१६/१०/२०१६ ते दि.१८/१०/२०१६ रोजी सेट परीक्षेच्या पेपर सेटींगसाठी पुणे येथे बैठकीकरीता उपस्थित होते.

३) दि.१६/१०/२०१६ रोजी जिओलॉजीकल फिल्ड ट्रेनिंग करिता अलमट्टी व कुडल संगम कर्नाटक येथे डॉ. डी. डी. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली एम.एस्सी. ॲपलाईड जिओलॉजी प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थी सहभागी झाले होते.

४) भूशास्त्र संकुलातील डॉ. आर. एस. गवळी (समन्वयक, ISRO-EDUSAT) यांच्या मार्गदर्शनाखाली ISRO-EDUSAT १८ व्या अभ्यासक्रमासाठी "बेसिक ऑफ आरएस, जीआयएस, जीएनएसएस" कोर्सकरिता दि. २८ ऑक्टोबर व ०४ नोव्हेंबर, २०१६ रोजी परीक्षा घेण्यात आली. सदर परीक्षेस ५५ विद्यार्थी उपस्थित होते.

५) राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र सोलापूर (NCRP) व सोलापूर विद्यापीठ सोलापूर यामध्ये संशोधन, शिक्षण इत्यादीची देवाण घेवाण व आदान-प्रदान या बाबतीत सामंजस्य करार (MOU) दि.३०/११/२०१६ रोजी मा. कुलगुरु व संचालक राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली कार्य संपन्न झाले. सामंजस्य करारासाठी संकुलाचे संचालक प्रा. पी. प्रभाकर, डॉ. व्ही. पी. धुळप, डॉ. डी. डी. कुलकर्णी व श्री.एस.पी.बाविस्कर उपस्थित होते.

६) एस. आर. भगवान आय्यंगर, संशोधक (अणुऊर्जा विभाग, भारत सरकार), बंगळूर यांनी पाहुणे व्याख्याता म्हणून दि.१२/१२/२०१६ रोजी "ऊर्जा स्थिती, आण्विक कचरा व्यवस्थापन आणि अणुऊर्जा तसेच आण्विक खनिज संशोधन" या विषयावर व्याख्यान देवून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सदरील व्याख्यानास संकुलातील एम. एस्सी विद्यार्थी, संशोधक विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते.

७) डॉ. डी. डी. कुलकर्णी (सहाय्यक प्राध्यापक) राष्ट्रीय परिसंवाद डेहराडून येथे शोध निबंध सादर करण्यासाठी दि.०७ डिसेंबर, २०१६ रोजी उपस्थित होते.

८) सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे आयोजित Global Initiative of Academic Networks (GIAN) यांच्या मार्फत घेण्यात आलेल्या Open Source Software, Open Data and Open Standards for Geoinformatics इत्यादी विषयावर प्रशिक्षणासाठी संकुलातील भूमाहितीशास्त्र मधील ०४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

९) डॉ. व्ही.पी. धुळप (सहाय्यक प्राध्यापक) यांनी एम.एस्सी. प्रात्यक्षिक व थिअरी परीक्षेकरिता परीक्षक म्हणून दि.२२/११/२०१६ व दि.२३/११/२०१६ रोजी पर्यावरणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे काम पाहिले.

१०) भूशास्त्र संकुलाकडील एम. एस्सी. भाग १ व २ भूशास्त्र विषयाची अभ्यास सहल दि.२१/१२/२०१६ ते दि.०६/०१/२०१७ पर्यंत डॉ. डी. डी. कुलकर्णी, डॉ. आर. एस. पवार व श्रीमती. एम. एम. इंगेवार यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर भारत भागात संपन्न झाली.

११) एम. एस्सी. भाग १ व २ भूमाहितीशास्त्र विषयाची अभ्यास सहल दि.२४/१२/२०१६ ते दि.०७/०१/२०१७ पर्यंत डॉ. व्ही. पी. धूळप व श्री. पी. एल. उन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली मध्य भारत भागात संपन्न झाली.

१२) एम. एस्सी. भाग १ व २ पर्यावरणशास्त्र विषयाची अभ्यास सहल दि.०१/०१/२०१७ ते दि.१५/०१/२०१७ पर्यंत डॉ. आर. एस. गवळी व श्री. एस. पी. बावीस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली दक्षिण भारत भागात संपन्न झाली.

१३) प्रा. पी. प्रभाकर हे श्री. शिव चरण माथूर शासकीय महाविद्यालय, मंडालग्रह, जिल्हा भिलवाडा, राजस्थान येथे नॅक मूल्यांकनाचे समिती सदस्य म्हणून दि.०४/०१/२०१७ ते दि.०७/०१/२०१७ रोजी पर्यंत कार्यरत होते.

१४) डॉ. आर. एस. गवळी हे दि.१६/१२/२०१६ ते दि.१७/१२/२०१६ रोजी पीएच. डी. मौखिक परीक्षेसाठी परिक्षक म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर येथे उपस्थित होते.

१५) डॉ. व्ही. पी. धुळप हे दि.१७/१२/२०१६ रोजी पर्यावरणशास्त्रच्या एम.एस्सी. प्रात्यक्षिक परीक्षेकरिता परिक्षक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ संलग्नित S.B.E.S. विज्ञान महाविद्यालय, औरंगाबाद येथे उपस्थित होते.

१६) प्रा. के. बी. पवार यांच्या सन्मानार्थ प्रा. पी. प्रभाकर, प्रा. ए. बी. नारायणपेठकर, प्रा. पी.टी.सावंत यांच्या सौजन्याने शै. वर्ष २०१६-१७ पासून अप्लाईड जिऑलॉजी या विषयातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना दीक्षांत समारंभात सुवर्ण पदक पारितोषिकाने सन्मान करण्याचा उपक्रमाची सुरुवात करण्यात आली.

१७) भूशास्त्र संकुलात दि.१८/०१/२०१७ ते दि.२०/०१/२०१७ रोजी नेट / सेट पेपर क्र. २ व ३ यासाठीच्या परीक्षेतील मार्गदर्शनासाठी संकुलातील भूशास्त्र, भूमाहितीशास्त्र व पर्यावरणशास्त्र या विषयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेत मार्गदर्शनासाठी बाहेरील विषयतज्ञ म्हणून डॉ. अशिष माने, डॉ. पी. पी. चौधरी व श्रीमती स्वाती

कांबळे व श्री. मुश्ताक शेख यांनी काम पाहिले. कार्यशाळेत नेट / सेट परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला होता. कार्यशाळेसाठी प्रा. पी. प्रभाकर, डॉ. आर. एस. गवळी व डॉ. व्ही. पी. धुळप यांनीही नेट / सेट पेपर क्र. ३ साठीच्या परीक्षेतील समस्येवर मार्गदर्शन केले.

१८) मदनसिंह मोहित-पाटील विज्ञान महाविद्यालय, मंगळवेढा येथील एकूण ३५ विद्यार्थी आणि ०४ प्राध्यापक यांनी भूशास्त्र संकुलाकडील संग्रहालयास भेट दिली. श्रीमती एम. डी. गाजूल आणि श्रीमती एन. टी. चव्हाण यांनी संग्रहालयातील देशातील तसेच विदेशातील संग्रहित विविध खडकांविषयीची माहिती यावेळी विद्यार्थ्यांना दिली.

१९) डॉ. के. एस. मिश्रा प्राध्यापक पेट्रोलियम आणि ऊर्जा विद्यापीठ, डेहराडून, उत्तराखंड यांचे भूशास्त्र संकुलात विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाशी निगडीत विषयावर दि.३० जानेवारी, २०१७ ते दि.०२ फेब्रुवारी, २०१७ दरम्यान मार्गदर्शन लाभले.

२०) डॉ. व्ही. पी. धुळप, सहाय्यक प्राध्यापक यांनी नेट परीक्षेकरिता पर्यवेक्षक म्हणून दि.२१ व २२ जानेवारी, २०१७ रोजी देव पब्लिक स्कूल, पुणे येथे उपस्थिती नोंदविली.

२१) रसायनशास्त्र संकुलात रुसा (RUSA) अंतर्गत Ice Making Machine-०२ Nos. (₹७,५९,०००/-) General Purpose Bench Top Fume Hood- ०७ Nos. उपकरणे खरेदी करण्यात आली (₹१४,६०,०००/-) तसेच संकुलाकरिता Rotary Evaporator-०३ Nos. (₹६,७५,०००/-) उपकरणे खरेदीची प्रक्रिया सुरु आहे.

२२) रसायनशास्त्र संकुलातील डॉ. ए. ए. घनवट, विभागप्रमुख, पॉलिमर केमिस्ट्री तथा सहयोगी प्राध्यापक यांनी South Korea येथे दि.०४ ते ०७ ऑक्टोबर, २०१६ दरम्यान शोधनिबंध सादर केला.

२३) रसायनशास्त्र संकुलाचे ३ विद्यार्थी SET / NET-JRF परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.

२४) दि.२७/१०/२०१६ रोजी Smart City वर आयोजित केलेल्या कार्यशाळेमध्ये डॉ. एम. व्ही. अशोक, डॉ. जगदीश पाटील, डॉ. जुहां कासकिनेन आणि डॉ. कसिकर हे सहभागी झाले होते. या कार्यशाळेमध्ये शहरातील मुलभूत सुविधा, घनकचरा व्यवस्थापन, पार्किंग सुविधा, महिलांसाठी शौचालय व रेल्वे स्टेशनचे आधुनिकीकरण या विषयांवर महत्वपूर्ण चर्चा करण्यात आली.

२५) दि.२७/१०/२०१६ रोजी Centre for Foresight Studies चे उदघाटन सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी फिनलँडमधील युनिव्हर्सिटी ऑफ तुर्कुचे डॉ. जुहा कासकिनेन, डॉ. अपूर्वा पालकर, डॉ. जगदीश पाटील, डॉ. सतीश देशपांडे, श्री. आनंद म्हापूसकर व एम.व्ही. अशोक यांची उपस्थिती होती.

२६) मलेशिया विद्यापीठ, मलेशिया येथे दि.०१ ते ०३ नोव्हेंबर, २०१६ या कालावधीत आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. जी.एस. कांबळे, सहयोगी प्राध्यापक यांनी Research Paper सादर केले.

२७) ज्येष्ठ पत्रकार मा. श्री. निळू दामले यांनी दि.१३/१२/२०१६ रोजी विद्यापीठ सामाजिकशास्त्र संकुलातील शिक्षक व Journalism and Mass Communication या विषयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

२८) महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त मा. श्री. ज. स. सहारिया यांनी दि.०४/०१/२०१७ रोजी "व्हर्च्यूअल क्लसरुम" द्वारे मतदार जागृतीबाबत विद्यार्थ्यांसमवेत संवाद साधला. सोलापूर विद्यापीठाच्या मुख्य सभागृहात अंदाजे ३०० विद्यार्थ्यांनी या संवादात सहभाग घेतला.

२९) मास कम्यूनिकेशन विभागातर्फे दि.०२/०१/२०१६ रोजी "माध्यमातील करियर संधी" या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली.

३०) विद्यापीठ स्तरीय अविष्कार संशोधन महोत्सवामध्ये दि.२७ ते २८ डिसेंबर, २०१६ दरम्यान WIT, सोलापूर येथे संपन्न झाला. विद्यापीठ अधिविभाग व संकुलातील १३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला व पारितोषिके मिळविली.

३१) दि.२५ डिसेंबर, २०१६ रोजी विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी Concentration, Personality Development व स्मरणशक्ती वाढीसाठी ०२ तासाचे श्रीमती साधना गंगा यांच्या Meditation Programme चे आयोजन करण्यात आले.

३२) सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय भारत सरकार यांच्या वतीने दि.२४/१०/२०१६ ते दि.२८/१०/२०१६ दरम्यान राष्ट्रीय सांख्यिकीय प्रणाली प्रशिक्षण अकादमी नोएडा येथे आयोजित "Official Statistics" या प्रशिक्षण कार्यक्रमात प्रा. डॉ. व्ही. बी. घुटे सहभागी झाले होते.

३३) सांख्यिकी व कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालय, भारत सरकार यांच्या सहकार्याने दि.०९/०१/२०१७ रोजी संख्याशास्त्र विभागाच्या वतीने "Creating Awareness about Official Statistics" या विषयावरील राष्ट्रीय परिसंवादचे आयोजन करण्यात आले. या सेमिनारसाठी संख्याशास्त्र व अर्थशास्त्र विषयाचे १५० विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. सदर सेमिनारसाठी सांख्यिकी मंत्रालयाकडून ₹४५,०००/- अनुदान प्राप्त झाले.

३४) रोख विरहित व्यवहार करण्यासंबंधी मार्गदर्शन करण्याकरिता प्रा. एन. एस. काटीकर यांचे दि.२७/१२/२०१६ रोजी विद्यापीठ सभागृहात आयोजित कार्यक्रमामध्ये वाणिज्य व व्यवस्थापन संकुलातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

३५) विद्यार्थ्यांसाठी प्रशासकीय सेवेतील संधी तसेच महिला संदर्भात सुरक्षा कायदे या विषयावर मार्गदर्शन करण्याकरिता श्रीमती कविता नेरकर-पवार यांचे दि.०२/०१/२०१७ रोजी विद्यापीठ सभागृहात व्याख्यान आयोजित कार्यक्रमामध्ये विद्यार्थी, संकुलातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदविला.

३६) वाणिज्य व व्यवस्थापन संकुलामध्ये दि.१७/०१/२०१७ रोजी ICICI Bank व Kotak Mahindra Bank मार्फत Campus Interview चे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये संकुलातील व संकुलाबाहेरील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामधून ३२ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

३७) मा. संचालक, प्रा. डॉ. सुर्यवंशी एस. एस. यांना CSIR या Funding Agency कडून प्रकल्प मंजुर झालेला आहे. सदर प्रकल्पाकरिता सन २०१६-१७ या आर्थिक वर्षाकरिता एकूण ₹१०,२१,६६७/- इतकी रक्कम मंजूर करण्यात आलेली आहे.

३८) प्रा. एल.पी.देशमुख हे International Conference on Electronics and Smart Devices (ISESD) २०१६) साठी Invited Talk आणि Session Chairman म्हणून तसेच "Recent Trends in

communication: Wireless Sensing Networks and Application या विषयावरती Speaker म्हणून Indonesia या ठिकाणी दि.२७ नोव्हेंबर ते ०२ डिसेंबर, २०१६ दरम्यान गेले होते.

- **राष्ट्रीय सेवा योजना:**

१) सोलापूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक श्री. शेख आफताब अन्वर, डी.बी.एफ.दयानंद आर्टस् ॲन्ड सायन्स कॉलेज, सोलापूर या स्वयंसेवकास २०१५-१६ Indira Gandhi National Award (N.S.S. Volunteer) पुरस्कार मिळाला. विद्यापीठाचा हा प्रथम राष्ट्रीय पुरस्कार आहे.

२) राष्ट्रीय सेवा योजना विभागीय केंद्र विजयानगर श्री. कृष्ण देवराया युनिव्हर्सिटी, बेलारी, कर्नाटक येथे दि.०३/१२/२०१६ ते दि.०९/१२/२०१६ या कालावधीमध्ये राष्ट्रीय एकात्मता शिबीर आयोजित केलेले आहे. सदर शिबीरामध्ये आपल्या विद्यापीठातील ०५ स्वयंसेवक व ०५ स्वयंसेविका सहभागी झाले आहेत.

३) सोलापूर विद्यापीठ, संलग्नित रा. से. यो. एकक असलेले सर्व महाविद्यालयांना महानेत्रदान अभियान-४ जानेवारी २०१७ रोजी आपल्या महाविद्यालयात राबविण्यात यावा व या दिवशी नेत्रदात्या विद्यार्थ्यांचे फॉर्म भरुन घेतले आहेत.

४) सोलापूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील एकक असलेल्या सर्व महाविद्यालयात दि.२६ नोव्हेंबर, २०१६ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला.

५) सोलापूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील एकक असलेल्या सर्व महाविद्यालयात मा. प्रधानमंत्री महोदयांच्या आदेशानुसार दि.१९ ते २५ नोव्हेंबर, २०१६ या आठवड्यात "कौमी एकता सप्ताह" साजरा करण्यात आला.

६) दि.०१ डिसेंबर, २०१६ रोजी जागतिक एड्स दिन रॅलीत सोलापूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनातील एकक असलेल्या महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजना विभाग प्रमुख व स्वयंसेवक विद्यार्थी/विद्यार्थिनी सहभाग नोंदविला.

७) सोलापूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेतील एकक असलेल्या सर्व महाविद्यालयांना श्री. शरद पोतदार, उपमुख्याध्यापक यांचे नेत्रदान प्रसार अभियानाबाबतचे पत्र पाठविण्यात आले.

८) राज्यात दि. ०१ जुलै, २०१६ रोजी ०२ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत रोपांचे संरक्षण, संगोपन आणि देखभाली विषयी सोलापूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनेतील एकक असलेल्या सर्व महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला.

९) सोलापूर विद्यापीठ संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेले सर्व महाविद्यालयांना सन २०१६-१७ मध्ये विशेष श्रमसंस्कार शिबीर आयोजन करण्याच्या प्रस्तावाबाबत व अनुदानाबाबतचे पत्र पाठविण्यात आले.

१०) सोलापूर विद्यापीठ संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेल्या महाविद्यालयांना मागणीनुसार सन २०१६-१७ विशेष श्रमसंस्कार शिबीराचे आयोजन करण्याबाबत मान्यतेचे पत्र पाठविण्यात आले.

११) सोलापूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनातील एकक असलेल्या सर्व महाविद्यालयात **२४ डिसेंबर, २०१६ हा दिवस "राष्ट्रीय ग्राहक दिन"** म्हणून साजरा करण्यात आला.

१२) सोलापूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनातील एकक असलेले सर्व महाविद्यालयातील स्वयंसेवकांच्या उपस्थितीत सोलापूर सकाळच्या पंधराव्या वर्धापन दिनानिमित्त नगरोटा (काश्मिर) येथे शत्रुशी सामना करताना शहीद झालेल्या कुणालगीर मुन्नागीर गोसावी यांच्या कुटुंबियांचा सकाळच्यावतीने सन्मान करण्यात आला.

१३) दि.२६ जानेवारी, २०१७ राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे होणाऱ्या रासेयो स्वयंसेवक संचलन (परेड) करिता १ स्वयंसेवक श्री. विशाल मारूती सावंत, आर्टस् ॲन्ड कॉमर्स कॉलेज माढा, १ स्वयंसेविका कुमारी अश्विनी नरेश मैले, ए.आर.बुर्ला महिला महाविद्यालय सोलापूर यांची निवड करण्यात आली आहे.

१४) सोलापूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनातील एकक असलेले सर्व महाविद्यालयांना रोकडरहित महाराष्ट्र स्वयंसेवकांना (Cashless Maharashtra Volunteers) हा उपक्रम राबविण्यासाठी पत्र पाठविण्यात आले.

१५) सोलापूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजनातील एकक असलेले सर्व महाविद्यालयांना विशेष श्रमसंस्कार शिबीर २०१६-१७ चालू आहे. लोकमंगल कृषि महाविद्यालय वडाळातर्फे शिबीरामध्ये शाश्वत शेती विकास / हवामान अनुकूल शेती विषय व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे.

१६) राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक व नवनिर्वाचित विभागीय समन्वयक यांची संयुक्त बैठक दि.२७/१२/२०१६ रोजी संपन्न झाली.

१७) राज्यस्तरीय राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम समन्वयक दोन दिवसीय कार्यशाळा व आढावा आणि नियोजन बैठक उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे दि.०५ व ०६ जानेवारी, २०१७ दरम्यान आयोजित करण्यात आली. या दोन दिवसीय कार्यशाळेस प्रा. डॉ. बी. एन. कांबळे, रासेयो कार्यक्रम समन्वयक हे उपस्थित होते.

१८) राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांसाठी राष्ट्रीय एकात्मता शिबीर दि. १७/०१/२०१७ ते २३/०१/२०१७ या कालावधीत Directorate of Technical Education, Govt. of Karnataka at B.V.V.S. Polytechnic, Bagalkot, Karnataka या ठिकाणी आयोजित करण्यात आले. सदर शिबीरास आपल्या विद्यापीठाचे ०५ स्वयंसेवक व ०५ स्वयंसेविका तसेच ०१ संघव्यवस्थापक प्रा. अमोल हरिदास बोबडे हे सहभागी झाले.

१९) राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांसाठी साहसी क्रीडा शिबीर दि. १८/०१/२०१७ ते २२/०१/२०१७ या कालावधीत श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती स्थित नॅशनल ॲडेव्हेंचर फाउंडेशन चिखलदरा, जिल्हा अमरावती या ठिकाणी आयोजित करण्यात आले. या शिबीराकरिता आपल्या विद्यापीठातून ०२ स्वयंसेवक व ०२ स्वयंसेविका तसेच ०१ संघव्यवस्थापक सहभागी झाले.

२०) सोलापूर विद्यापीठ संलग्नित राष्ट्रीय सेवा योजना एकक असलेले सर्व महाविद्यालयांनी २५ जानेवारी, २०१७ रोजी मतदार जागृती अभियान राबविण्याबाबतचे रॅलीमध्ये सहभाग नोंदविला.

२१) सन २०१६-१७ विशेष श्रमसंस्कार शिबीर दि. ०१ डिसेंबर, २०१६ ते ३१ जानेवारी, २०१७ च्या दरम्यान संपन्न झाले. यामध्ये एकूण ५७ महाविद्यालयांनी सहभाग नोंदविला.

➢ **विद्यार्थी कल्याण विभाग:**

१) सोलापूर विद्यापीठाचा तेरावा युवा महोत्सव (उन्मेष सृजनरंगाचा) दि.०२ ते दि.०५ ऑक्टोबर, २०१६ दरम्यान SVERIS कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, गोपाळपूर पंढरपूर येथे संपन्न झाला. युवा महोत्सवात एकूण २७ विविध कलाप्रकाराचे आयोजन करण्यात आले. युवा महोत्सवात ७७८ मुले, ५४२ मुली, महिला व पुरुष संघव्यवस्थापक १७५ असे एकूण १४९५ व्यक्तींनी सहभाग नोंदविला. प्रथम क्रमांकाचे सर्व साधारण विजेतेपद श्री. शिवाजी महाविद्यालय, बार्शी यांना, द्वितीय क्रमांक वालचंद कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर आणि तृतीय क्रमांक शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलुज यांना गुणानुक्रमे देण्यात आला.

२) राजभवन, मुंबई आयोजित आंतर विद्यापीठ इंद्रधनुष्य युवा महोत्सव डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथे दि.०५/११/२०१६ ते दि.०९/११/२०१६ दरम्यान आयोजित करण्यात आला होता. युवा महोत्सवात सहभागी होण्याकरिता एकूण ४० कलाकारांच्या सराव शिबीराचे आयोजन दि.१६/१०/२०१६ ते दि.०४/११/२०१६ या दरम्यान एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगांव येथे करण्यात आले होते. युवा महोत्सवात स्पॉट फोटोग्राफी या कलाप्रकारात प्रदीप सलगर यांना द्वितीय क्रमांक मिळाला तर मातीकाम या कलाप्रकरात रविंद्र सुतकर यांना द्वितीय क्रमांक मिळाला तर कातरकाम या कला प्रकरात संजू मेरगू यांना द्वितीय क्रमांक अशी एकूण ३ पारितोषिके प्राप्त झाली. शिबीरा दरम्यान तसेच प्रत्यक्ष युवा महोत्सवात प्रा. जाकीर हुसेन मुलाणी व प्रा. रविंद्र देशमुख यांनी संघव्यवस्थापनाचे कार्य केले.

३) युवा महोत्सवासाठी सहभागी होण्यासाठी विविध कलाप्रकरात संघात एकूण ३४ विद्यार्थी-विद्यार्थिनी कलाकार, २ संघव्यवस्थापक व ४ साथीदार सहकारी असा एकूण ४० व्यक्तींच्या सराव शिबीराचे आयोजन विद्यापीठ परिसरात दि.२०/१२/२०१७ ते दि.०३/०१/२०१७ या दरम्यान आयोजित करण्यात आले होते. ३२ वा पश्चिम विभागीय युवा महोत्सव गणपत विद्यापीठ म्हैसाना, गुजरात येथे दि.०६/०१/२०१७ ते दि.१०/०१/२०१७ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. सदर महोत्सवात विद्यापीठास भित्तीचित्र या कलाप्रकारात प्रथम निर्मीतीचित्र या कलाप्रकारात प्रथम, एकांकीका या कलाप्रकारात द्वितीय तर नकला या कलाप्रकारात तृतिय असे एकूण चार पारितोषिक मिळाली. शिबीरा दरम्यान तसेच प्रत्यक्ष युवा महोत्सवात डॉ. एस. एस. पाटील, डी. ए. व्ही. वेलणकर वाणिज्य महाविद्यालय, सोलापूर यांनी संघव्यवस्थापनाचे कार्य केले.

४) आसोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज आयोजित ३२ वा राष्ट्रीय युवा महोत्सव शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे दि.१०/०२/२०१७ ते दि.१४/०२/२०१७ या कालावधीत आयोजित करण्यात आला होता. युवा महोत्सवात ११ विद्यार्थी कलाकार व संघव्यवस्थापक डॉ. एस. एस. पाटील, डी. ए. व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर हे सहभागी झाले होते. चार कलाप्रकारासाठी विद्यार्थ्यांच्या सराव शिबीराचे आयोजन विद्यापीठ परिसरात दि. ३१/०१/२०१७ ते दि.०९/०२/२०१७ या दरम्यान करण्यात आले होते. राष्ट्रीय युवा महोत्सवात विद्यापीठास निर्मितीचित्र या कलाप्रकारात द्वितीय, भित्तीचित्र या कलाप्रकारात तृतिय अशी एकूण दोन पारितोषिके मिळाली.

- **क्रीडा विभाग:**

१) पंजाब विद्यापीठ, चंदिगढ येथे दि.२७ ते २८ आक्टोबर, २०१६ दरम्यान झालेल्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ जलतरण स्पर्धेत सोलापूर विद्यापीठाचा संघ सहभागी झाला होता त्यात कु.अबोली संगवे या खेळाडूस ३ मी. स्प्रींग बोर्ड डायव्हींग या प्रकारात कांस्य पदक प्राप्त झाले.

२) दि.२७ नोव्हेंबर ते ०१ डिसेंबर, २०१६ या दरम्यान झालेल्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे झालेल्या २० व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव स्पर्धेत सोलापूर विद्यापीठाच्या कु.संतोषी प्रकाशराव देशमुख (कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पढंरपूर) हिने थाळी फेक मध्ये सुवर्ण पदक प्राप्त केले तसेच रोहित भारत चव्हाण (सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील महाविद्यालय, नातेपुते. ता.माळशिरस) यांने भाला फेक मध्ये रौप्य पदक व थाळी फेक मध्ये कांस्य पदक प्राप्त केले.

३) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ / पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी ज्या त्या खेळाकरीता गठीत निवड समितीच्या अहवालानुसार त्या त्या महाविद्यालयातील खेळाडूना सराव शिबिरास उपस्थित राहण्याबाबत ईमेलद्वारे कळविण्यात आले. नियुक्त संघ मार्गदर्शक/ संघ व्यवस्थापक यांचे नावे क्रीडा समन्वयक यांचे शिफारसीनुसार प्रशासकीय मान्यतेने अग्रीम देण्यात आली असून सराव शिबाराकरीता क्रीडा विभागाकडे उपलब्ध असलेले संबंधितांच्या मागणीनुसार क्रीडा समन्वयक यांच्या शिफारसीनुसार खेळाचे साहित्य, खेळाडू विद्यार्थ्यांना ट्रॅक सुट, किट्स, संघ व्यवस्थापकांना ट्रॅक सूट, क्रीडा किटस् देण्यात आले.

४) आंतरविद्यापीठ / पश्चिम विभागीय / क्रीडा महोत्सव इत्यादी स्पर्धेच्या सराव शिबिर, स्पर्धेच्या खर्चासाठी देण्यात आलेल्या अग्रीम रकमेच्या प्राप्त प्रस्तावाच्या समायोजनाचे काम सुरु असून ज्या ज्या महाविद्यालयाच्या शा. शिक्षण संचालकानी समायोजन देयक प्रस्ताव सादर केलेले नाहीत, उर्वरित रकमेचा भरणा केला नाही. त्यांना परिपत्रक व पत्रान्वये समायोजन करण्याबाबत कळविले आहे.

५) विद्यापीठ परीसरातील वसतिगृहातील मुलाना / मुलींच्या मागणीनुसार उपलब्ध व नविन क्रीडा साहित्य खरेदी करुन खेळाचे साहित्य देण्यात येत आहे.

६) विद्यापीठ अनुदान आयोग यांचे कडून प्राप्त ₹६ लाख मधून क्रीडा साहित्य खरेदी करण्याकरीता प्रक्रिया करण्यात आली आहे.

७) सन २०१६-१७ च्या अखिल भारतीय आंतर विद्यापीठ / पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ स्पर्धा अंतिम टप्प्यात असून दि.१६ ते १९ मार्च दरम्यान अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेचे यजमान पद कुरुक्षेत्र विद्यापीठ, कुरुक्षेत्र (हरियाना) यांच्याकडे असून या स्पर्धेत सोलापूर विद्यापीठाचा योगासन (मुले व मुलींचा) संघ सहभागी होणार असून या स्पर्धेची डिटेल एन्ट्री अंतिम झाल्यानंतर संबंधित विद्यापीठास कळविण्याचे काम सुरु आहे.

सदर बैठकीत पुढीलप्रमाणे कामकाज झाले.

**[ १ ] अधिसभेच्या दि.१९ नोव्हेंबर, २०१६ रोजी झालेल्या चौदाव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

(टिपणी: सर्व अधिसभा सदस्यांना परिनियम क्र.४८५ नुसार विद्यापीठ पत्र जा.क्र. सोविसो /सनिवि/अधिसभा/१०८७४, दि.०१/१२/२०१६ अन्वये, दि.१९ नोव्हेंबर, २०१६ रोजी झालेल्या चौदाव्या बैठकीचा कार्यवृत्तांत पाठविण्यात आलेला होता. या कार्यवृत्तांतामध्ये दुरुस्त्या सुचविण्याची अंतिम तारीख दि.२९/१२/२०१६ अशी होती. या मुदतीत कोणत्याही सदस्यांकडून दुरुस्त्या प्राप्त झालेल्या नाहीत.

सबब, अधिसभेचा दि.१९ नोव्हेंबर, २०१६ रोजी झालेल्या चौदाव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यासाठी मान्यतेसाठी सादर).

**ठराव: अधिसभेच्या दि.१९ नोव्हेंबर, २०१६ रोजी झालेल्या चौदाव्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला.**

**[ २ ] तक्रार निवारण समितीच्या पदावर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५७ (३) (ba) च्या अनुषंगाने अधिसभेच्या वतीने नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठाच्या विविध अधिकारमंडळाच्या निवडणूका ३१ ऑगस्ट, २०१७ पर्यंत पुढे ढकलल्याच्या महाराष्ट्र शासनाने दि.०१/१०/२०१६ रोजी प्रसिध्द केलेल्या राजपत्रात नमूद केल्याप्रमाणे "२०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२५-कृषितर व तंत्रज्ञानेत्तर विद्यापीठांच्या प्राधिकरणांच्या व मंडळांच्या सदस्यांच्या निवडणूका तात्पुरत्या पुढे ढकलण्यासाठी आणि नामनिर्देशनाद्वारे व स्वीकृतीद्वारे उक्त प्राधिकरणे व मंडळे घटित करण्याबाबत" कळविले आहे.

यापूर्वी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५७(३) नुसार गठीत केलेल्या तक्रार निवारण समितीची मुदत दि.३१ ऑगस्ट, २०१५ रोजी संपुष्टात आलेली आहे. त्यास्तव शासन निर्णयानुसार नव्याने तक्रार निवारण समिती गठीत करावी लागणार आहे. त्यास्तव सदर समितीवर अधिसभेच्या वतीने नामनिर्देशन करुन घेण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ५७(३) (ba) नुसार तक्रार निवारण समिती गठीत करण्याबाबत खालीलप्रमाणे तरतूद नमूद केलेली आहे.

| | |
|---|---|
| महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५७(३) (ba) | two members of the Senate nominated by the members of the Senate, from amongst themselves, one of them being the woman representative of the management and one shall be a teacher; |

सबब, तक्रार निवारण समितीवर महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील ५७ (३) (ba) च्या अनुषंगाने अधिसभेच्या वतीने नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ).

ठराव: **दि.०१ मार्च, २०१७ पासून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ लागू झालेला असल्याने तक्रार निवारण समितीवरील नामनिर्देशनाबाबतचा विषय पुढील बैठकीत सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.**

**[ ३ ] विद्यापीठाचे सन २०१६-१७ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१७-१८ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

प्राचार्य आर. वाय. पाटील यांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने खालील प्रस्ताव सादर केलेला आहे.

"ही अधिसभा वित्त व लेखा समितीने व व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन असा ठराव करते की, व्यवस्थापन परिषदेने सन २०१६-१७ चे सुधारीत अंदाजपत्रक व २०१७-१८ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत केलेली शिफारशी मान्य करुन मंजूर करण्यात यावी".

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ७५ (२) (e) आणि १०१ नुसार विद्यापीठाचे सन २०१६-१७ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१७-१८ चे मूळ अंदाजपत्रक तयार करण्याकरीता महाराष्ट्र विद्यापीठे समान लेखा संहिता कलम २.१२ नुसार खालीलप्रमाणे अर्थसंकल्प उपसमिती गठीत करण्यात आली होती.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्राचार्य श्री. आर. वाय. पाटील | : | अध्यक्ष |
| २) | श्री. बी. पी. पाटील | : | सदस्य |
| ३) | डॉ. ए. ए. शेख | : | निमंत्रित तज्ञ सदस्य |
| ४) | डॉ. आर. एस. मेंते | : | निमंत्रित तज्ञ सदस्य |
| ५) | डॉ. बी. सी. शेवाळे | : | सदस्य - सचिव |

उपरोक्त उपसमितीने दि.१५, १६ व २७ डिसेंबर, २०१६ रोजी सर्व विभाग व संकुलप्रमुख यांचेसमवेत बैठक घेऊन व त्यांचेशी चर्चा करुन तयार केलेले सन २०१६-१७ चे सुधारीत अंदाजपत्रक व २०१७-१८ चे मूळ अंदाजपत्रक वित्त व लेखा समितीच्या दि.०९/०४/२०१७ रोजी झालेल्या बैठकीसमोर विषय क्र.०३ नुसार सादर केले असता, त्यावर सर्वकष चर्चा होऊन त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

| | |
|---|---|
| ठराव : | सन २०१६-१७ चे सुधारीत अंदाजपत्रकास व सन २०१७-१८ च्या मूळ अंदाजपत्रक दुरुस्तीसह व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली. |

वरीलप्रमाणे वित्त व लेखा समितीची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या दि.२४/०१/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत विषय क्र.०३ अन्वये विचारार्थ सादर केली असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

| | |
|---|---|
| ठराव : | विद्यापीठाचे सन २०१६-१७ चे सुधारित अंदाजपत्रकास व सन २०१७-१८ च्या मूळ अंदाजपत्रकास वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस दुरुस्तीसह स्विकारुन अधिसभेस सर्वानुमते मान्यतेची शिफारस करण्यात आली. |

सबब, विद्यापीठाचे सन २०१६-१७ चे सुधारीत अंदाजपत्रक व सन २०१७-१८ च्या मूळ अंदाजपत्रकाबाबत व्यवस्थापन परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ).

ठराव: **मा.कुलगुरुमहोदयांनी डॉ. बी. सी. शेवाळे वित्त व लेखा अधिकारी यांना सोलापूर विद्यापीठाचे सन २०१६-१७ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१७-१८ चे मूळ अंदाजपत्रक सादर करण्याबाबत सांगितले. त्यानुसार डॉ. बी. सी. शेवाळे वित्त व लेखा अधिकारी यांनी सोलापूर विद्यापीठाचे सन २०१६-१७ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१७-१८ चे मूळ अंदाजपत्रक सादर केले. त्यास प्रा. पी. प्रभाकर यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर खालील सदस्यांनी त्यांचे विचार मांडले.**

**१) डॉ. एस. एम. देशपांडे २) डॉ. डी. एम. वलेकर ३) डॉ. ए. ए. घनवट**

**सर्व सदस्यांनी या अंदाजपत्रकावर मुद्देसूद चर्चा केली व सदर अंदाजपत्रके सूचना दुरुस्तीसह सर्वानुमते मान्य करण्यात आले.**

[ ४ ] **महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला व विविध अधिकार मंडळाने यापूर्वी मान्य केलेला शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालीन शैक्षणिक बृहत आराखडा महाराष्ट्र शासनाच्या दि.२१/१०/२०१६ रोजीच्या पत्रास अनुसरुन महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने सुधारित करुन तयार केलेल्या बृहत आराखड्यास महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १४(७) अन्वये मा. कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली शिफारस स्विकारुन, विद्या परिषदेने मान्यतेसाठी अधिसभेस केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ८२(१) मध्ये बृहत आराखड्याबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे

"The university shall prepare a perspective plan and get the same approved by the State Council for Higher Education for educational development for the location of colleges and institutions of higher learning in a manner ensuring equitable distribution of facilities for Higher Education having due regard, in particular, to the needs of unnerved and under developed areas within the jurisdiction of the University. Such plan shall be prepared by the Board of College and University Development and shall be placed before the Academic Council and the Senate through the Management Council and shall, if necessary, be updated every year."

शैक्षणिक वर्ष २०११-१२ ते २०१५-१६ या पाच वर्षाच्या बृहत आराखड्याचा कालावधी संपलेला असून शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून नवीन महाविद्यालय सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्यासाठी सन २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा शैक्षणिक बृहत आराखडा तयार केलेला आहे. त्याअनुषंगाने यापूर्वी केलेली कार्यवाही खालील प्रमाणे आहे.

सदर विषय दि.१५/०७/२०१४ रोजीच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या बैठकीमध्ये ठेवण्यात आला असता, त्यावर खालील प्रमाणे ठराव करण्यात आलेला होता.

१) शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाच्या दिर्घकालीन बृहत आराखडा तयार करण्याकरिता स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिर निवेदन देवून वेगवेगळ्या संस्था / महाविद्यालयाकडून सूचना मागवून घेण्यात याव्यात.
२) शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाच्या दिर्घकालीन बृहत आराखडा तयार करण्याकामी एक उपसमिती नेमण्याचे अधिकार मा. कुलगुरुमहोदयांना देण्यात आले.
३) सदर बृहत आराखडा बाबतचा उपसमितीचा अहवाल पुढील महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात यावा.

उक्त ठरावाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाच्या दिर्घकालीन बृहत आराखडा तयार करण्याकरिता स्थानिक वर्तमानपत्रामध्ये जाहिर निवेदन देवून वेगवेगळ्या संस्था / महाविद्यालयाकडून सूचना मागवून घेण्यात आलेले होते. तसेच महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने दिलेल्या अधिकारान्वये मा. कुलगुरुमहोदयांनी शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालीन बृहत आराखडा तयार करण्याकामी खालीलप्रमाणे उपसमिती नियुक्ती केलेली होती.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. प्रा. डॉ. एन. एन. मालदार | | | | अध्यक्ष |
| २. | श्री. धर्मराज काडादी | सदस्य | ३. | डॉ. बी. वाय. यादव | सदस्य |
| ४. | प्राचार्य डॉ. ए. एल. देशमुख | सदस्य | ५. | प्राचार्य डॉ. जी. एन. चिट्टे | सदस्य |
| ६. | प्राचार्य डॉ. एस. ए. हलकुडे | सदस्य | ७. | प्राचार्य डॉ. एस. के. पवार | सदस्य |
| ८. | प्रा. डॉ. एस. एस. सुर्यवंशी | सदस्य | ९. | डॉ. महादेव देशमुख | सदस्य |
| १०. | डॉ. डी. जी. कदम | सदस्य | ११. | डॉ. श्रीकांत येळेगावकर | सदस्य |
| १२. | डॉ. पी. प्रभाकर | सदस्य | १३. | प्राचार्य आर. वाय. पाटील | सदस्य |
| १४. | डॉ. व्ही. पी. उबाळे | सदस्य | १५. | डॉ. गौतम कांबळे | सदस्य |
| १६. | डॉ. ए. एम. रंगरेज | सदस्य | १७. | डॉ. ॲनी जॉन | सदस्य |
| १८. | डॉ. पी. पी. वडगावकर | सदस्य | १९. | श्री. जी. के. देशमुख | सदस्य |
| २०. | डॉ. एस. एन. सलवदे | सदस्य | २१. | प्राचार्य डॉ. एम. ए. दलाल | सदस्य |
| २२. | श्री. शरद ठाकरे | सदस्य | २३. | श्री. राम रेड्डी | सदस्य |
| २४. | श्री. उल्हास पाटील | सदस्य | २५. | श्री. के. एम. जमादार | सदस्य |
| २६. | प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे | | | | सदस्य सचिव |

सदर उपसमितीची बैठक मा. कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.०७/११/२०१४ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीमध्ये वेगवेगळ्या व्यक्ती तथा संस्थाकडून प्राप्त झालेले निवेदने सादर करुन प्रस्तूत विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाच्या दिर्घकालीन बृहत आराखडा तयार करण्यात आलेला होता. तसेच प्रस्तूत विद्यापीठातील सर्व संकुलाचे संचालक यांच्याशी चर्चा करुन विद्यापीठ परिसरातील अभ्यासक्रमांना बृहत आराखडा तयार करण्याचे अधिकार मा. कुलगुरु महोदयांना देण्यात आलेले होते.

उपसमितीने तयार केलेला बृहत आराखडा शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाकरिता नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठीचा दिर्घकालीन बृहत आराखडा तसेच विद्यापीठ परिसरातील सर्व संकुलाच्या संचालकांशी चर्चा करुन विद्यापीठ परिसरातील अभ्यासक्रमाचे मा. कुलगुरुमहोदयांनी तयार केलेला बृहत आराखडा दि.१०/१२/२०१४ रोजीच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळासमोर विषय क्र.३ अन्वये विचारार्थ सादर केला असता, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने सोबत जोडल्याप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालीन शैक्षणिक बृहत आराखडा तयार करुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेला होता.

महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा शैक्षणिक बृहत आराखडा दि.२३/१२/२०१४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये विचारार्थ सादर केला असता, ठराव क्र.०६ अन्वये व्यवस्थापन परिषदेने सदर बृहत आराखडा विद्या परिषदेस दुरुस्तीसह (बार्शी येथे कला आणि वाणिज्य अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयाचा समावेश) सुधारित बृहत आराखडा तयार करुन सदर बृहत आराखडा विद्या परिषदेला शिफारस केलेला होता. व्यवस्थापन परिषदेने केलेल्या शिफारशीला अनुसरुन सदरचा विषया दि.१७/०१/२०१५ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीमध्ये सादर केला असता, विद्या परिषदेने ठराव क्र.११० अन्वये अधिसभेला शिफारस केली.

उपरोक्त प्रमाणे विद्या परिषदेने दुरुस्तीसह मान्यता दिलेला बृहत आराखडा दि.२९/०३/२०१५ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीमध्ये सादर केले असता, सदरचे बृहत आराखड्यास अधिसभेने ठराव क्र.०५ अन्वये मान्यता दिलेली होती.

उपरोक्तप्रमाणे सर्व अधिकार मंडळाच्या मान्यतेअंती प्रस्तूत कार्यालयाच्या दि.२१/०५/२०१५ रोजीचे पत्र क्र.सोविसो/मवविमं/संलग्नता/१५०७ अन्वये मान्यतेसाठी मा. सचिव, महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद तथा शिक्षण संचालक (उ.शि.), पुणे, मा. अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई व मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर यांच्याकडे सादर करण्यात आलेले होते.

दरम्यान पा. म. ताकटे, उपसचिव, महाराष्ट्र शासन यांनी दि.२९/०४/२०१५ रोजीचे पत्र क्र.उशिप/१११३/प्र.४०५/विशि-३ मधील मुद्दा क्र.२ व ३ मध्ये खालील बाब नमूद केलेली आहे.

- मुद्दा क्र.२ : उच्च शिक्षण हे ग्रामीण, डोंगराळ, आदिवाशी, नक्षलग्रस्त इत्यादी भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावे या हेतूने संपूर्ण राज्यामध्ये महाविद्यालयाचे अभ्यासपूर्ण व समतोल जाळे निर्माण होणे अपेक्षित आहे. तथापि, मागील वर्षी जवळपास २५% जागा रिक्त होत्या. तसेच चालू वर्षी मान्यता देण्यात आलेल्या नवीन महाविद्यालये, विद्याशाखा, अभ्यासक्रम व वाढीव तुकड्या या माध्यमातून वाढीव प्रवेश क्षमता निर्माण झाले आहे. यास्तव राज्यातील सर्व अकृषि विद्यापीठांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१५-१६ साठी नवीन महाविद्यालय (पारंपारिक, व्यावसायिक) विद्याशाखा, विषय / अभ्यासक्रम, वाढीव तुकड्यांचा प्रस्तावांना मान्यता न देण्याचा निर्णय शासन स्थरावर घेण्यात आलेला आहे. सदरचा निर्णय सर्व संस्था / महाविद्यालयांना विद्यापीठ स्थरावरुन कळविण्यात यावा.
- मुद्दा क्र.३ : त्याचप्रमाणे वर नमूद केल्याप्रमाणे अधिनियमातील तरतूदीनुसार विद्यापीठानी तीन महिन्याच्या आत सुधारित बृहत आराखडा तयार करुन तो उच्च शिक्षण परिषदेच्या मान्यतेसाठी सादर करावा. सदर निर्देशाची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी.

उपरोक्त मुद्दा क्र.३ अवलोकनी घेता, विद्यापीठाने तीन महिन्याच्या आत सुधारित बृहत आराखडा तयार करुन तो उच्च शिक्षण परिषदेस सादर करण्याच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा बृहत आराखडा दि.१३/०८/२०१५ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीमध्ये सादर केला असता, ठराव क्र.५० अन्वये विद्या परिषदेनी मान्यता दिलेली आहे.

तसेच, मा. उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षक विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि.२१/१०/२०१६ रोजीच्या पत्रान्वये राज्य उच्च शिक्षण परिषदेच्या दि.१८/१०/२०१६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत कळविले असून त्यातील मुद्दा क्र.१ खालीलप्रमाणे आहे.

मुद्दा क्र.१: "डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या शिफारशींचा सखोल अभ्यास करुन तसेच दि.२९/०४/२०१५ रोजीच्या परिपत्रकातील सूचनांप्रमाणे सर्व अकृषि विद्यापीठांनी सन २०१७-१८ चे वार्षिक आराखडे तसेच ५ वर्षाचे बृहत आराखडे नव्याने शास्त्रोक्त व गरजाधारित तयार करुन राज्य उच्च शिक्षण परिषदेला सादर करावेत."

त्यास अनुसरुन प्रस्तूत विद्यापीठाकडून तयार करण्यात आलेला शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा सुधारित बृहत आराखडा पुनश्चः एकदा मा. सचिव, महाराष्ट्र राज्य शिक्षण परिषद तथा शिक्षण संचालक (उ.शि.), पुणे, मा. अवर सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई व मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर यांच्याकडे सादर करावा लागणार असल्याने शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालीन शैक्षणिक बृहत आराखडा सुधारित करण्यास्तव दि.०५/०१/२०१७ रोजीच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाच्या बैठकीत फेरविचारार्थ सादर करण्यात आला असता, त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

"शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालीन शैक्षणिक बृहत आराखडा डॉ. नरेंद्र जाधव समितीच्या शिफारशीच्या अनुषंगाने वि दि.२९/०४/२०१५ रोजीच्या शासन परिपत्रकातील सूचनांप्रमाणे खालील दुरुस्तीसह सुधारित करुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आला.

- पंढरपूर तालुका अंतर्गत शेगांव दुमाला येथे कला व वाणिज्य या महाविद्यालयाचा समावेश करावा."

उक्त निर्णयाच्या अनुषंगाने महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला पाच वर्षाच्या शैक्षणिक बृहत आराखड्यास महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२(१) मधील तरतूदीनुसार व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत व तद्नंतर विद्या परिषदेच्या बैठकीत सादर करणे आवश्यक आहे.

परंतु प्रस्तूत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक दि.२४/०१/२०१७ रोजी तर विद्या परिषदेची बैठक दि.१२/०१/२०१७ रोजी आयोजित असल्याने व सदरचा शैक्षणिक बृहत आराखडा शासनास तातडीने सादर करावयाचा असल्याने मा. कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) मधील तरतूदीनुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने विद्या परिषदेस शिफारस करण्यास मान्यता दिलेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालीन शैक्षणिक बृहत आराखडा सुधारित करण्यास्तव दि.१२/०१/२०१७ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीत फेरविचारार्थ सादर करण्यात आला असता, त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

"महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला, व्यवस्थापन परिषदेने व विद्या परिषदेने शिफारस केलेला व अधिसभेने यापूर्वी मान्य केलेला शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालीन शैक्षणिक बृहत आराखडा महाराष्ट्र शासनाच्या दि.२१/१०/२०१६ रोजीच्या पत्रास अनुसरुन महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने सुधारित करुन तयार केलेला बृहत आराखडा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४

कलम १४(७) अन्वये मा. कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली शिफारस स्विकारुन अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली."

सबब, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला व विविध अधिकार मंडळाने यापूर्वी मान्य केलेला शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालीन शैक्षणिक बृहत आराखडा महाराष्ट्र शासनाच्या दि.२१/१०/२०१६ रोजीच्या पत्रास अनुसरुन महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने सुधारित करुन तयार केलेल्या बृहत आराखड्यास महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम १४(७) अन्वये मा. कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली शिफारस स्विकारुन, विद्या परिषदेने मान्यतेसाठी अधिसभेस केलेली शिफारस विचारार्थ).

ठराव: **महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला व विविध अधिकार मंडळाने यापूर्वी मान्य केलेला शैक्षणिक वर्ष २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षाचा दिर्घकालीन शैक्षणिक बृहत आराखडा महाराष्ट्र शासनाच्या दि.२१/१०/२०१६ रोजीच्या पत्रास अनुसरुन महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने सुधारित करुन तयार केलेल्या बृहत आराखड्यास मा. कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली शिफारस स्विकारुन, विद्या परिषदेने मान्यतेसाठी केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[ ५ ] शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या एका वर्षाचा महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला अल्पकालिन शैक्षणिक बृहत आराखड्यास मा. कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली शिफारस स्विकारुन, विद्या परिषदेने दुरुस्तीसह मान्यतेसाठी अधिसभेस केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी: बृहत आराखड्याविषयी महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ कलम ८२(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

The university shall prepare a perspective plan and get the same approved by the State Council for Higher Education for educational development for the location of colleges and institutions of higher learning in a manner ensuring equitable distribution of facilities for higher education having due regard, in particular, to the needs of unserved and under developed areas within the jurisdiction of the university. Such plan shall be prepared by BCUD and shall be placed before the Academic Council and the Senate through the Management Council and shall, if necessary, be updated every year.

महाराष्ट्र विद्यापीठ अधनियम १९९४ कलम ८२(१) नुसार शैक्षणिक बृहत आराखडा महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळामार्फत तयार करण्याची तरतूद आहे.

शै. वर्ष २०१८-१९ पासून नवीन महाविद्यालय, विषय / अभ्यासक्रम व विद्याशाखा सुरु करण्याचे प्रस्ताव स्विकारण्यासाठी सन २०१६-१७ ते २०२०-२१ या पाच वर्षीय बृहत आराखडा व प्राप्त निवेदन अवलोकनी घेवून दि.०५/०१/२०१७ रोजीच्या महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने ठराव क्र.०३ नुसार शै. वर्ष २०१८-१९ या वर्षाचा अल्पकालीन शैक्षणिक बृहत आराखडा तयार करुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेला आहे.

उक्त तरतूदीस अनुसरुन, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला एका वर्षाचा शैक्षणिक बृहत आराखडा महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२(१) मधील तरतूदीनुसार व्यवस्थापन परिषेच्या बैठकीत व तद्नंतर विद्या परिषदेच्या बैठकीत सादर करणे आवश्यक आहे.

परंतु प्रस्तूत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक दि.२४/०१/२०१७ रोजी व विद्या परिषदेची बैठक दि.१२/०१/२०१७ रोजी आयोजित असल्याने व सदरचा शैक्षणिक बृहत आराखडा मान्यतेस्तव शासनास सादर करावयाची कार्यवाही विहीत वेळेत होण्यास्तव मा. कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) मधील तरतूदीनुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने विद्या परिषदेस शिफारस करण्यास मान्यता दिलेली आहे.

त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या एका वर्षाचा अल्पकालीन शैक्षणिक बृहत आराखडा दि.१२/०१/२०१७ रोजीच्या विद्या परिषदेच्या बैठकीत सादर केला असता, विद्या परिषदेने ठराव क्र.७३(१७) अन्वये खालीलप्रमाणे दुरुस्तीसह अधिसभेस शिफारस केलेली आहे.

| अ.क्र. | बृहत आराखड्यातील ठिकाण | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| | | |
| १) | सांगोला / जुनोनी | बॅचलर ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी ॲन्ड डिझाईन यानंतर "बी. ए., बी. एस्सी, एम. ए, एम. एस्सी," यांचा नव्याने समावेश करण्यात यावा. |
| | | |
| २) | पंढरपूर | कला व वाणिज्य रात्र महाविद्यालय यानंतर "बी. एफ. ए." यांचा नव्याने समावेश करण्यात यावा. |

दि.१२/०१/२०१७ रोजीच्या विद्या परिषदेने उक्तप्रमाणे सूचित केलेल्या दुरुस्त्या शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या एका वर्षाच्या अल्पकालीन शैक्षणिक बृहत आराखड्यात समाविष्ट करण्यात आलेल्या आहेत.

सोलापूर विद्यापीठ
॥ विद्यया संपन्नता ॥
NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA-2.62)

**सोलापूर विद्यापीठ, सोलापूर**

**शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून नवीन महाविद्यालय / अभ्यासक्रम / विद्याशाखा सुरु करु इच्छिणाऱ्या संस्थासाठी शैक्षणिक बृहत आराखडा**

सोलापूर विद्यापीठ कार्यक्षेत्रात ज्या नोंदणीकृत संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून कायम विना अनुदानित तत्वावर खालीलप्रमाणे (प्रस्तावित ठिकाण व त्यासमोरील अभ्यासक्रमासाठी) नवीन महाविद्यालय सुरु करावयाचे आहेत. (बी. बी. ए., बी. सी. ए, बी. एस्सी (ई. सी. एस.), शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र, समाजकार्य (बी. एस. डब्ल्यू व एम. एस. डब्ल्यू), इंजिनिअरींग, फार्मसी, एम. बी. ए, बायोटेक्नॉलॉजी व एम. सी. ए. या अभ्यासक्रमाची महाविद्यालये वगळता) अशा सर्व नोंदणीकृत संस्थांना कळविण्यात येते की, सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षासाठी खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे (विद्यापीठाच्या बृहत आराखड्यानुसारच) विद्यापीठाच्या विहीत नमून्यात प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. सदर बृहत आराखडा हा संलग्नित महाविद्यालयामध्ये नवीन अभ्यासक्रम व नवीन विद्याशाखा सुरु करण्यासाठीही लागू राहील.

नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२(३) नुसार दि.३१ ऑक्टोबर, २०१७ पर्यंत विद्यापीठाकडे महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ कार्यालयात, कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळता स्विकारण्यात येतील. विहीत नमुन्यातील अर्ज वित्त व लेखा विभाग (प्रकाशन विभागात) रु.१,०००/- शुल्कास कार्यालयीन वेळेत विक्रीस उपलब्ध आहेत.

| अ.क्र. | बृहत आराखड्यातील ठिकाण | अभ्यासक्रम |
|---|---|---|
| १. | | सोलापूर शहर |
| | सोलापूर शहर | विधी महाविद्यालय |
| | | चित्रकला महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य व सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम |
| | | बी. एफ. ए., एम. एफ. ए., बी. आर्किटेक्चर |
| | | M. Sc. Physics |
| | | M. Sc. Physics (Solid State) |
| | | M. Sc. (Medicinal Chemistry) |
| | | M. Sc. Microbiology (Applied Microbiology) |
| | | M. Sc. Microbiology (Industrial Microbiology) |
| २. | | उत्तर सोलापूर |
| | वडाळा | वाणिज्य महाविद्यालय, विज्ञान महाविद्यालय |
| ३. | | दक्षिण सोलापूर |
| | वळसंग | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | बोरामणी | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | होटगी / फताटेवाडी / आहेरवाडी | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| ४. | | अक्कलकोट |
| | अक्कलकोट | विज्ञान महाविद्यालय |
| | | कला विद्याशाखे अंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम |
| | दुधनी / चपळगाव | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | मैंदर्गी | कला व वाणिज्य महाविद्यालय |
| ५. | | बार्शी |
| | बार्शी | कला व वाणिज्य महाविद्यालय |
| | वैराग | विज्ञान महाविद्यालय |
| | | कला व सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत पदव्युत्तर अभ्यासक्रम |
| | जामगाव | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | रेल्वे इंजिनिअरींग महाविद्यालय |
| | मालवंडी | कला महाविद्यालय |
| ६. | | मोहोळ |
| | मोहोळ | विज्ञान महाविद्यालय |
| | नरखेड | कला व विज्ञान महाविद्यालय |
| | कामती बुद्रूक / कुरुल | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| ७. | | मंगळवेढा |
| | मंगळवेढा / नंदेश्वर | कला व वाणिज्य महाविद्यालय |
| | बोराळे / डोणज | कला व विज्ञान महाविद्यालय |
| | सलगर (बु.) | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |

| | | |
|---|---|---|
| | सांगोला | |
| ८. | सांगोला / जुनोनी | बॅचलर ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी ॲन्ड डिझाईन |
| | | बी. ए., बी. एस्सी., एम. ए. व एम. एस्सी. |
| | चिक महूद / महूद / वाकी शेवणे | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| ९. | माढा | |
| | माढा / कुर्डुवाडी | कला व विज्ञान महाविद्यालय |
| | टेंभूर्णी | वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | | बी. जे. सी. व एम. जे. सी. |
| १०. | माळशिरस | |
| | माळशिरस | वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | नातेपुते | जर्नालिझम महाविद्यालय |
| | जाधववाडी | कला व विज्ञान महाविद्यालय |
| | पानीव | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | तांबवे | कला महाविद्यालय |
| ११. | करमाळा | |
| | जेऊर / झरे | वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | भिलारवाडी / जिंती | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| १२. | पंढरपूर | |
| | पंढरपूर | संत वाडमय महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय |
| | | कला, वाणिज्य रात्र महाविद्यालय |
| | | बी. एफ. ए. |
| | कोर्टी | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | चळे | कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय |
| | शेगांव दुमाला | कला व वाणिज्य महाविद्यालय |
| टिप: १) | शै. वर्ष २०१८-१९ साठी मान्यता प्राप्त संस्था / संलग्नित महाविद्यालयांकडून बी. बी. ए., बी.सी.ए., बी. एस्सी (ई.सी.एस), शिक्षणशास्त्र, शारिरीक शिक्षणशास्त्र, समाजकार्य (एम.एस.डब्लु), इंजिनिअरींग, फार्मसी, एम. बी. ए., बायोटेक्नॉलॉजी व एम. सी. ए. या अभ्यासक्रमाचे प्रस्ताव स्विकारले जाणार नाहीत. | |
| २) | नॅक मुल्यांकन /पुनर्मुल्यांकन झालेल्या 'अ' मानांकन प्राप्त महाविद्यालयाना प्राधान्य असेल. | |
| ३) | नामवंत औद्योगिक संस्थांना सामाजिक बांधीलकी म्हणून नवीन उच्च दर्जाची महाविद्यालये / अभ्यासक्रम सुरु करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. | |
| ४) | बृहत आराखडा संदर्भात शासनाकडून वेळोवेळी विहीत केली जाणारी मार्गदर्शक तत्वे / सूचना /आदेश लागू राहतील. | |

SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR

Academic Prospective Plan

For Solapur University Campus, Solapur

२०१८-१९

New Academic Departments on Campus (Proposed)

| Sr. No. | Name of the Proposed Department |
|---|---|
| | FACULTY OF ARTS |
| १. | Department of English |
| २. | Department of Hindi |
| ३. | Department of Marathi |
| ४. | Department of Chinese |
| ५. | Department of Sanskrit and Prakrit Language |
| ६. | Department of Kannada |
| ७. | Department of Foreign Language (French, German, Russian, Japanese) |
| ८. | Department of Urdu |
| ९. | Department of Fine Arts (Music, Drama, Fashion Design & Fine Arts) |
| | FACULTY OF COMMERCE AND MANAGEMENT |
| १. | Department of Commerce |
| २. | Department of Management |
| | FACULTY OF SCIENCE |
| १. | Department of Bio-Technology |
| २. | department of Food Science & Nutrition |
| ३. | Department of Zoology |
| ४. | Department of Geography |
| ५. | Department of Botany |
| ६. | Department of Bio Chemistry |
| ७. | Department of Scientific Computing |
| ८. | Department of Bioinformatics |
| ९. | Department of Microbiology |
| १०. | Department of I.T. |
| ११. | Department of Inorganic Chemistry |
| १२. | Department of Analytical Chemistry |
| १३. | Department of Physical Chemistry |
| १४. | Department of Medicinal Chemistry |
| Sr. No. | Name of the Proposed Department |
| १५. | Department of Textile Chemistry |
| १६. | Department of Petroleum Geology |
| १७. | Department of Environmental Geology |

| | |
|---|---|
| १८. | Department of Nano Science & Nano Technology |
| १९. | Department of Disaster Management |
| | FACULTY OF LAW |
| १. | Department of Law |
| | FACULTY OF SOCIAL SCIENCES |
| १. | Department of Economics |
| २. | Department of History |
| ३. | Department of Library & Information Science |
| ४. | Department of Philosophy |
| ५. | Department of Psychology |
| ६. | Department of Political Science |
| ७. | Department of Women Study & Human Rights |
| ८. | Department of Adult & Continuing Education |
| ९. | Department of Sociology |
| १०. | Department of Human Rights |
| ११. | Department of Tourism |
| १२. | Department of Futuristic Studies |
| | FACULTY OF ENGINEERING & TECHNOLOGY |
| १. | Department of Pharmacy |
| | FACULTY OF SPORTS EDUCATION |
| १. | Department of Sports |
| | FACULTY OF TECHNOLOGY |
| १. | Department of Technology |
| | FACULTY OF EDUCATION |
| १. | Department of Education |
| २. | Department of Physical Education |
| | OTHER FACULTY |
| १. | National Service Scheme |
| २. | Department of Students Welfare |
| ३. | Competitive Exam Centre and Placement Cell |
| ४. | Academic Staff College |

सबब, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या एका वर्षाचा महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेल्या अल्पकालिन शैक्षणिक बृहत आराखड्यास मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली शिफारस स्विकारुन, विद्या परिषदेने दुरुस्तीसह मान्यतेसाठी अधिसभेस केलेली शिफारस विचारार्थ).

ठराव: **शैक्षणिक वर्ष २०१८-१९ या एका वर्षाचा महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळाने तयार केलेला अल्पकालिन शैक्षणिक बृहत आराखड्यास मा. कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन**

परिषदेच्या वतीने केलेली शिफारस स्विकारुन, विद्या परिषदेने दुरुस्तीसह मान्यतेसाठी केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

[ ६ ] अधिसभा सदस्य डॉ. डी. एम. वलेकर यांनी खालील ठराव मांडण्यासाठी आपली सूचना पाठविली आहे.

"सोलापूर विद्यापीठाच्या प्रशासकीय कार्यालयास दुसऱ्या व चौथ्या शनिवारी असलेल्या सुट्टीमध्ये बदल करुन पहिल्या व तिसऱ्या शनिवारी सुट्टी देण्यात यावी, अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे."

ठराव: सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. व्ही. बी. पाटील यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर तांत्रिक कारणास्तव सदरचा प्रस्ताव मागे घेण्याबाबत डॉ. डी. एम. वलेकर यांनी सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे प्र. कुलसचिवांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| प्र. कुलसचिव | मा. कुलगुरु |
| सदस्य सचिव, अधिसभा | अध्यक्ष, अधिसभा |